cmyk

# दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–२०६ | सोमवार, दि.१८ नोव्हेंबर २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | • पाने– ६ | किंमत ३ रूपये





## संपादकीय

### निवडणूक निर्णायक टप्प्यावर...

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचा प्रचार आता अंतिम टप्प्यात म्हणजे एक दिवसाचा राहिलेला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, काँग्रेस नेते राहुल गांधी, राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे नेते शरद पवार, सेनेचे प्रमुख उद्धव ठाकरे यांच्यासह मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, मनसेचे प्रमुख राज ठाकरे यांच्या प्रचारसभांनी राज्यातील वातावरण ढवळून निघाले. मागच्या दोन ते अडीच वर्षांत राज्यात मोठी उलथापालथ झाली आहे. त्यामुळे महाविकास आघाडी आणि महायुतीमधील लढत निकराची आहे. याशिवाय मनसे, परिवर्तन महाशक्ती तसेच बंडखोर वा अपक्षांचीही जंत्री या निवडणुकीत आहे.

# खुल्या बाजारात सोयाबीनचे दर पडलेलेच

## सहा हजार दराने शासनालाच करावी लागणार खरेदी



**पुणे । प्रतिनिधी**

**पंतप्रधान मोदी यांनी सोयाबीनला किमान आधारभूत किंमत सहा हजार रुपये प्रति क्विंटल देण्यात येईल, अशी घोषणा केल्याचे वृत्त आहे. सोयाबीन उत्पादकांसाठी हा दिलासादायक निर्णय असला, तरी खुल्या बाजारात हा दर मिळणे अशक्य असल्याने वाढीव दराचा बोजा सहन करीत उत्पादित सर्वच सोयाबीनची खरेदी शासनाला करावी लागेल, असे बाजार विश्लेषकांनी सांगितले.**

मध्य प्रदेशनंतर महाराष्ट्र हे सोयाबीन लागवड आणि उत्पादकतेत देशात दुसऱ्या क्रमांकाचे राज्य आहे. त्यामुळेच यंदाच्या विधानसभा निवडणुकीत कमी दराने विकल्या जाणाऱ्या सोयाबीनचा मुद्दा विरोधक आणि सत्ताधाऱ्यांच्या अजेंड्यावर असल्याचे चित्र आहे. विरोधातील काँग्रेसने सोयाबीनला सात हजार रुपये देण्याची घोषणा केली. त्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोयाबीनला सहा हजार रुपयांचा हमीभाव देणार असल्याचे थेट जाहीर केले. विशेष म्हणजे यापूर्वी सत्ताधारी महायुतीकडून सोयाबीन उत्पादकांना भावांतर योजनेच्या माध्यमातून हेक्टरी पाच हजार रुपयांची मदत जाहीर केली आहे. जागतिक बाजारात सध्या सोयाबीन दहा डॉलर प्रति बुशेल (तीन हजार रुपये क्विंटल), तर सोया पेंडचा दर २८ रुपये प्रति किलो (२८०० रुपये क्विंटल) आहे. अशातच भारतीय शेतकऱ्यांच्या सोयाबीनला सहा हजार पान २ वर

## सुसंस्कृत उमेदवाराला मतदान करा–जयदत्त क्षीरसागर



**बीड । प्रतिनिधी**

मतदानाचा पवित्र दिवस २० नोव्हेंबरला असून, संविधानाने दिलेल्या लोकशाही अधिकाराचा योग्य उपयोग करून सुसंस्कृत व विकासकेंद्रित उमेदवाराला मतदान करावे. आपल्या जवळच्या व्यक्तीला निवडण्याऐवजी समाजाच्या विकासासाठी काम करणाऱ्या उमेदवाराला मतदान करावे, असे आवाहन माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी केले.

शहरातील पंचशील नगर, शाहूनगर भागात संवाद मेळाव्याचे शनिवारी आयोजन केले होते. यावेळी महायुतीचे उमेदवार डॉ.योगेश क्षीरसागर यांच्यासह मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. जयदत्त क्षीरसागर यांनी भाषणादरम्यान मतदारांना जाती–धर्माच्या नावाखाली होणाऱ्या राजकीय फूटपाडा या विरोधात सावध राहण्याचे पान २ वर

# मुंडे बहिण–भाऊ ओबीसी उमेदवारांना बळ देणार की वाऱ्यावर सोडणार ?

## माजलगावात माधव निर्मळ, आष्टी भीमराव धोंडे, गेवराई प्रियंका खेडकर स्पष्ट संदेशाच्या प्रतीक्षेत



**बीड । प्रतिनिधी**

**लोकसभा निकालानंतर बीड जिल्ह्यामध्ये ओबीसींची वज्रमुठ आवली गेली. त्यामुळे मतदान करायचं तर ओबीसी उमेदवारालाच करायचं, असा निर्धार ओबीसी समाजाने केला होता. शिवाय बीड जिल्ह्यातील ओबीसी उमेदवारांच्या पाठीशी मुंडे बहिण भाऊ राहतील अशी अपेक्षा सुद्धा ओबीसी समाजाने व्यक्त केली होती.. मतदानाला अवघे दोन दिवस बाकी असताना मुंडे बहीण भावाच्या स्पष्ट संदेशाच्या ओबीसी समाज प्रतीक्षेत आहे. स्पष्ट असा संदेश दिला जाणार की, ओबीसी उमेदवाराला वाऱ्यावर सोडले जाणार याकडे आता संपूर्ण ओबीसी समाजाचे लक्ष लागले आहे. माजलगावमध्ये माधव निर्मळ, आष्टीमध्ये भीमराव धोंडे आणि गेवराई मध्ये प्रियंका खेडकर यांना मुंडे बहीण भावाकडून बळ दिले जाणार का? याची उत्सुकता आता सर्वांनाच लागली आहे.**

लोकसभा निवडणुकीमध्ये भाजप नेत्या पंकजा मुंडे यांचा मराठा आणि ओबीसी संघर्षामुळे पराभव झाला. हा पराभव बीड जिल्ह्यातीलच नव्हे तर संपूर्ण राज्यातील ओबीसी समाजाच्या ज्वारी लागला. अनेकांनी आत्महत्या केल्या. त्यानंतर बीड जिल्ह्यामध्ये ओबीसी समाजाची वजन आवळली गेली. ज्या पद्धतीने लोकसभा निवडणुकीत मराठा समाजाने नेत्यांचा ऐकलं नाही, नेत्यांनी अंधारात वेगळा संदेश दिला, मराठा समाजाच्या उमेदवाराला मत दिलं, त्याचप्रमाणे आता बीड जिल्ह्यातील सहा मतदारसंघांमध्ये ज्या ठिकाणी ओबीसी उमेदवार असतील त्या ठिकाणी ओबीसी पान २ वर

### आता नाही तर कधीच नाही

बीड जिल्ह्यातील सहापैकी परळी माजलगाव बीड आष्टी आणि गेवराई या मतदारसंघांमध्ये ओबीसी आमदार होण्याची नामी संधी आहे. त्यासाठी मुंडे बहीण भावाने ताकद लावणे सुद्धा आवश्यक आहे. मात्र त्यांच्यासमोर पक्ष आणि युती धर्म हा सुद्धा तेवढाच महत्त्वाचा आहे. त्यामुळे सर्वच ओबीसी उमेदवाराला मदत केली जाईल की नाही याबद्दल संभ्रम आहे. यावेळी ओबीसी आमदार जास्तीत जास्त करण्याची खऱ्या अर्थाने आम्ही संधी आहे. आता नाही तर कधीच नाही अशा मूडमध्ये सध्या ओबीसी असल्याचे दिसून येत आहे.

## रमेश आडसकर सर्व जाती धर्माला सोबत घेऊन चालणारं व्यक्तीमत्व– बाबूराव पोटभरे

### मुजम्मिल पटेलांचा आडसकरांना पाठिंबा

**माजालगाव । प्रतिनिधी**

रमेश आडसकर हे सर्वांना सोबत घेऊन चालणारं, सर्व जाती धर्मातील लोकांना समान न्याय व आपुलकी देणारं व्यक्तिमत्व असुन त्यांना जनतेने निवडूण दिल्यास माजलगाव मतदासंघांला एक युवा, जनतेसाठी कामं करण्याची प्रचंड क्षमता व आवड असलेला लोकप्रतिनिधी लाभणार असल्याचे प्रतीपादन बहुजन विकास मोर्चाचे संस्थापक बाबुराव पोटभरे यांनी केले.

माजलगाव शहरातील सामाजिक कार्यकर्ते मुजमील पटेल यांनी अपक्ष उमेदवार रमेश आडसकरांना जाहीर पाठिंबा दिला या वेळी हनुमान चौकात जाहीर सभेचे पान २ वर



## राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष– चिन्ह प्रकरणी उद्या सुनावणी

**नवी दिल्ली । वृतसंस्था**

**राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आणि चिन्ह प्रकरणी सुनावणी १९ नोव्हेंबरला होणार आहे. यापूर्वी १३ नोव्हेंबरला झालेल्या सुनावणीत अजित पवार गटाने शरद पवारांचा फोटो अजिबात वापरायचा नाही. तसेच घड्याळ चिन्ह वापरताना जो मजकूर न्यायालयाने लिहायला सांगितला आहे, तो प्रत्येक ठिकाणी लिहिला गेलाच पाहिजे, अशी ताकीद सर्वोच्च न्यायालयाने अजित पवार गटाला दिली होती.**

१९ नोव्हेंबरला होणाऱ्या सुनावणीत अजित पवार गटाला 'आम्ही सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांचे पालन करत आहोत, असे सांगावे लागणार आहे आणि या संदर्भातील दाखलेही त्यांना द्यावे लागणार आहेत. दरम्यान, मागील सुनावणीत शरद पवार गटाचे वकील सिंघवी यांनी अजित पवार गटाचे आमदार अमोल मिटकरी यांच्याद्वारे करण्यात आलेली एक सोशल मीडियावरील पोस्ट न्यायालयाला दाखवली. या पोस्टमध्ये शरद पवारांचा फोटो वापरण्यात आला पान २ वर

## मताच्या वेळी जात आठवते शिक्षण भरती करताना किती माळी, वंजारी, मराठ्यांना सेवेत घेतले ?

### अपक्ष उमेदवार भीमराव धोंडे यांना माजी नगराध्यक्ष रंगनाथ धोंडे यांचा सवाल

**आष्टी । प्रतिनिधी**

आष्टी विधानसभा मतदारसंघाची निवडणूक चांगली तापली असून आष्टी विधानसभा मतदारसंघांमध्ये महायुतीचे उमेदवार सुरेश रामचंद्र धस व महायुतीच्या बंडखोरी करणारे माजी आमदार भीमराव धोंडे यांच्या लढत होत असून भीमराव धोंडे हे या निवडणुकीला जातीवादी रंग देत असून आपण ओबीसी असल्याने ओबीसींनी एकूण माझ्या पाठीशी राहावा असे ते आपल्या प्रचार दौऱ्यात प्रत्येक गावात जाहीर सोबत बोलत आहेत मात्र भीमराव धोंडे हे स्वतःला शिक्षण महर्षी म्हणतात शिक्षण संस्थेमध्ये ज्यावेळी सेवेमध्ये जागा भरल्या जातात त्यावेळी मतदारसंघातील किती माळी वंजारा व इतर ओबीसी समाजाला आपण न्याय दिला आहे याचे आत्मपरीक्षण करावे असे विधान माजी नगराध्यक्ष रंगनाथ धोंडे यांनी केले आहे आपण आपल्या संस्थेमध्ये नगर जिल्ह्यातील जास्तीत जास्त लोक शिक्षण सेवेत भरले आहेत . यावरून आपण मतदारसंघांमध्ये कशा पद्धतीचा जातीवाद करतात हे जनतेला दिसून आले आहे त्यामुळे उद्या होऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकीमध्ये पान २ वर



## नरेंद्र मोदींच्या राजवटीत फक्त उद्योगपती अदानीच सेफ – प्रियंका गांधी

**गडचिरोली । प्रतिनिधी**

विधानसभेच्या निवडणुकीच्या भारतीय जनता पक्ष व पंतप्रधान नरेंद्र मोदी एक हैं तो सेफ हैं चा नारा देत आहेत. सेफ म्हणजे सुरक्षित पण नरेंद्र मोदींच्या ११ वर्षातील राजवटीत देशातील शेतकरी, कामगार, महिला, वा तरूण कोणाही सेफ नाही जर कोणी सेफ असेल तर ते फक्त उद्योगपती गौतम अदानीच आहेत, असा हल्लाबोल अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या सरचिटणीस पान २ वर



## वंचित पुरस्कृत अपक्ष उमेदवार सचिन चव्हाण यास बेदम मारहाण केल्या प्रकरणी पाच जण अटकेत

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**भाजपशी हात मिळवणी करून प्रचाराच्या नावाखाली पैसे काढल्याचा मनात राग धरून वंचित बहुजन आघाडी पुरस्कृत अपक्ष उमेदवार सचिन चव्हाण यास बेदम चोप दिल्या प्रकरणी अंबाजोगाई पोलिसांनी पाच जणांना अटक केली असून सर्वांची बीड कारागृहात रवानगी करण्यात आली आहे.**

केज विधानसभा मतदार संघातील वंचित बहुजन आघाडी पुरस्कृत अपक्ष उमेदवार सचिन चव्हाण याने भाजपकडून पैसे घेतल्याप्रकरणी संतप्त झालेल्या वंचित बहुजन आघाडीच्या कार्यकर्त्यांनी सचिन चव्हाण यांच्या अंगावर ऑइल ओतून बेदम चोप दिला. हा व्हिडीओ सोशल मीडीया वर व्हायरल होताच मा. जिल्हादंडाधिकारी साहेब बीड यांचे जामाबंदी आदेश क्र.२०२४/गृह विभाग/प्र.कार्यवाही १/१/मु.पो.का. कलम १९५१–२३९ दिनांक १४/११/२०२४ चे उल्लंघन केले म्हणून माझी त्यांचे विरुध्द कलम १८९(२), १९१(२), १९१(३), १९०, ११५(२), ११८(१) भारतीय न्याय संहीता, सह कलम १३५ महाराष्ट्र पोलीस अधिनियम प्रमाणे अंबाजोगाई शहर पोलीस स्टेशन पान २ वर

### बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.१६ नोव्हेंबर २०२४

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ४०.५० क्विंटल | २,२९१ | ३,२४० | २,७३५ |
| ज्वारी/हायब्रिड:१११.५० क्विंटल | २,००० | २,९०१ | २,३२६ |
| मका/लोकल: ७.०० क्विंटल | २,१५० | २,१५० | २,१५० |
| तूर : १.०० क्विंटल | ८,००० | ८,००० | ८,००० |
| उडीद : ३५.०० क्विंटल | ५,००० | ७,६०० | ६,६२७ |
| बाजरी: ५६.५० क्विंटल | २,३१० | ३,००१ | २,६७८ |
| मुग : १.५० क्विंटल | ६,९५० | ७,२५१ | ७,१०० |
| सोयाबीन: ६६०.०० क्विंटल | ३,६०० | ४,२७१ | ४,१२९ |
| हरभरा: १.५० क्विंटल | ६,८०१ | ७,७०० | ७,२५० |

# 'वोट,कटवा' भूमिकेतील उमेदवारासाठी मतदान वाया घालवू नका– सुरेश धस

## सुरेश धस यांच्या गटनिहाय कॉर्नर बैठका हाऊसफुल

**आष्टी । प्रतिनिधी**

**आष्टी,पाटोदा शिरूर कासार या विधानसभा मतदारसंघातील निवडणुकीने संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष वेधले आहे या निवडणुकीतील एक उमेदवार हे माझे हक्काचे मतदान कमी व्हावे या हेतूने निवडणूक लढवीत असल्याने या 'वोट कटवा' भूमिकेतील उमेदवारास मतदान करून आपले मत वाया घालू नका असे प्रतिपादन भाजपा शिवसेना रिपाई आणि मित्रपक्ष या युतीचे उमेदवार माजी राज्यमंत्री सुरेश धस यांनी केले. लोणी येथील प्रचार जाहीर सभेत ते बोलत होते.**

मी भारतीय जनता पार्टीतर्फे उमेदवारी अर्ज दाखल केला होता त्यानुसार मला भाजपातर्फे उमेदवारी मिळालेली आहे मात्र अपक्ष फॉर्म भरलेले उमेदवार अपक्ष म्हणून निवडणूक लढवत आहेत मागील दहा वर्षात निष्क्रिय राजकारण करणाऱ्या या अपक्ष उमेदवाराला मते मिळणार नाहीत त्याच बरोबर इतर दोन उमेदवार राजकीय पक्षांचे आहेत परंतु त्यांची तिसऱ्या आणि चौथ्या क्रमांकासाठी लढत आहे त्यामुळे मला मिळणारी हक्काची मते कमी व्हावी त्या उद्देशाने निवडणूक लढवणाऱ्या ''वोट कटवा '' भूमिकेतील उमेदवाराला मत दिल्यास अपक्ष उमेदवाराला त्याचा लाभ होण्याची शक्यता आहे त्यामुळे विचारवंत मतदारांनी अत्यंत विचारपूर्वक मला मतदान करावे असे आवाहन ही त्यांनी यावेळी केले.



सभेच्या अध्यक्ष स्थानावरून बोलताना माजी आमदार साहेबराव दरेकर म्हणाले की, मी शरदचंद्र पवार साहेबांच्या पक्षात गेली ४० वर्षे काम करत आहे.२००९ च्या निवडणुकीमध्ये मी सुरेश धस यांना आमदार केले २०१४ च्या निवडणुकीत भीमराव धोंडे यांना पाठिंबा देऊन त्यांना विजयी केले आणि २०१९ ला बाळासाहेब आजबे यांना संपूर्ण पाठिंबा देऊन त्यांनाही विजयी केले याचा अर्थ मी ज्याच्या सोबत आहे तो पान २ वर

cmyk

अग्रलेख

# निवडणूक निर्णायक टप्प्यावर...

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचा प्रचार आता अंतिम टप्प्यात म्हणजे एक दिवसाचा राहिलेला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, काँग्रेस नेते राहुल गांधी, राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे नेते शरद पवार, सेनेचे प्रमुख उद्धव ठाकरे यांच्यासह मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, मनसेचे प्रमुख राज ठाकरे यांच्या प्रचारसभांनी राज्यातील वातावरण ढवळून निघाले. मागच्या दोन ते अडीच वर्षांत राज्यात मोठी उलथापालथ झाली आहे. त्यामुळे महाविकास आघाडी आणि महायुतीमधील लढत निकराची आहे. याशिवाय मनसे, परिवर्तन महाशक्ती तसेच बंडखोर वा अपक्षांचीही जंत्री या निवडणुकीत आहे. हे बघता अनेक मतदारसंघांमधील निकाल हे अनपेक्षित तसेच धक्कादायक असू शकतात.

राज्यात विधानसभेच्या एकूण २८८ जागा आहेत. सत्ता स्थापनेकरिता १४४ च्या मॅजिक फिगरपर्यंत पोहोचणे आवश्यक असेल. हे बघता कोणत्याही एका पक्षाला सत्तेपर्यंत पोहोचता येणार नाही. महायुतीमध्ये भाजप सर्वाधिक दीडशेच्या आसपास जागा लढवत आहे. भाजपने ९० ते १०५ जागांचे टार्गेट ठेवल्याचे मानले जाते. याशिवाय पक्षाने अनेक मतदारसंघांमध्ये पडद्यामागून बंडखोरांनाही बळ दिल्याचे सांगण्यात येते. पक्षाचे आमदार, प्लस बंडखोर व अपक्षांची साथ या बळावर आपला आकडा १२५ च्या वर नेण्याचे भाजपचे उद्दिष्ट आहे. तिथवर पोहोचता आल्यास पक्षाला केवळ २० ते २५ जागांची आवश्यकता भासेल. ती शिंदे व दादा गटाच्या माध्यमातून पूर्ण केली जाईल. यातून आपले वर्चस्व टिकवणे आणि वाढवणे तसेच दोन्ही गटांना एका मर्यादेपर्यंत ठेवण्याचा भाजपचा हेतू स्पष्ट दिसतो. या निवडणुकीतही शिंदे व दादा गटाला रोखण्यासाठी भाजपाने रणनीती आखल्याचे बोलले जाते.

मागच्या काही दिवसांपासून मुख्यमंत्रिपदासाठी देवेंद्र फडणवीस यांचेच नाव चर्चेत होते. अमित शहा यांनीही फडणवीस यांच्या विजयासाठी मतदान करण्याचे आवाहन केल्याने या चर्चेला उधाण आले होते. मात्र, पक्षाचे राष्ट्रीय नेते विनोद तावडे यांच्या विधानाने पुन्हा यात ट्विस्ट निर्माण झाल्याचे दिसते. मुख्यमंत्रिपदासाठी महायुती नवा चेहरा देऊ शकते, असे विधान तावडे यांनी केले आहे. त्यामुळे हा नवा चेहरा कोण राहणार, याबाबत उत्सुकता असेल. मागच्या काही दिवसांमध्ये भाजपला सातत्याने मराठा आरक्षणाचे नेते मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाचा सामना करावा लागला. लोकसभेत त्याची झळही पक्षाला बसली. याचा विचार करता पक्ष मराठा कार्ड खेळण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसे झाल्यास विनोद तावडे यांच्याशिवाय चंद्रकांतदादा पाटील, आशिष शेलार यांच्या नावाचाही विचार होऊ शकतो. दुसरीकडे शिंदे व दादादेखील मनातल्या मनात मांडे भाजत असतील. परंतु, त्यांना कितपत संधी असेल, याविषयी साशंकता वाटते. फिफ्टी फिफ्टीची शक्यता गृहीत धरली, तर महाविकास आघाडीलाही संधी उपलब्ध होऊ शकते. आघाडीत सर्वाधिक म्हणजे १०० च्या आसपास जागा काँग्रेसने लढवल्या आहेत. तर त्यापाठोपाठ ठाकरे आणि शरद पवार गटाचे उमेदवार रिंगणात दिसतात. लोकसभेचा स्ट्राईक रेट कायम राहिला, तर मुख्यमंत्रिपदाकरिता काँग्रेसलाही संधी असू शकते. काँग्रेसमध्ये बाळासाहेब थोरात, पृथ्वीराज चव्हाण, नाना पटोले, विजय वडेट्टीवार, यशोमती ठाकूर अशी मोठी मांदियाळी आहे. त्या पलीकडे जाऊन नवीन चेहरा द्यायचा झाला, तर बंटी पाटील, संग्राम थोपटे यांच्यासारख्या नेत्यांचा त्यांना विचार करावा लागेल. राष्ट्रवादीमध्ये जयंत पाटील, सुप्रिया सुळे, तर ठाकरेसेनेमध्ये उद्धव ठाकरे यांचेच नावे प्रामुख्याने आघाडीवर दिसते. तथापि, मेरिटचा निकष मुख्यमंत्रिपदाकरिता महत्त्वाचा ठरण्याची शक्यता अधिक होय. वेगवेगळे सर्व्हे, त्यांचे पोल पुढे आले आहेत. त्यातही मतमतांतरे दिसतात. शेवटी जनता काय निर्णय देते, यावरच सर्व काही अवलंबून असेल. तथापि, या खेपेला अपक्षांची संख्या वाढू शकते. तसे झाले, तर सत्तेच्या दोऱ्या त्यांच्या हातात असू शकतात. अपक्षांच्या मदतीने सरकार स्थापण्याचा भाजपाचा प्रयत्न असू शकतो. परंतु, भाजपची गाडी ७०, ७५ पर्यंतच अडकली, तर मात्र हा प्लॅन फिसकटेल. आता हा सामना निर्णायक टप्प्यावर असून, तो पुढे काय वळण घेतो, हेच आता बघायचे.

# मी समाजासाठी माझे कुंकू गमावले–डॉ.ज्योती मेटे

## डॉ.ज्योती मेटे यांच्या प्रचारार्थ चऱ्हाटा येथे अभूतपूर्व सभा

बीड । प्रतिनिधी

**बीड मतदार संघातील लोकप्रिय महिला उमेदवार डॉ. ज्योती विनायकराव मेटे यांनी मतदारांचा वाढता प्रतिसाद मिळत असून काल त्यांची लिंबागणेश सर्कलची चऱ्हाटा पंचायत समिती गणाची जाहीर सभा चऱ्हाटा येथे पार पडली लोकनेते विनायकराव मेटे यांनी हायातीत केलेल्या कामाची पोचपावती म्हणून त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याचा मतदारांनी निश्चय केला आहे. या सभे प्रसंगी डॉ. ज्योती मेटे भाऊक होत मी समाजासाठी आपलं कुंकू गमावलं आहे. या समाजाकडून फक्त एकच मागणी आहे जनतेने बॅटरी टॉर्च समोरील बटन दाबून मझ्या जीवनातील अंधकार दूर करावा आणि मझ्या पदरात मतदानाचे दान टाकावे आणि आपल्या साथीच्या जोरावर मी मतदार संघाचा अंधकार दूर करेल अशी भावनिक साद यावेळी त्यांनी घातली.**



मतदारसंघाच्या लोकप्रिय अपक्ष उमेदवार डॉ. ज्योती विनायकराव मेटे यांना ''बॅटरी टॉर्च'' हे निवडणूक चिन्ह घेवून गावोगावी पोहचल्या आहेत. दररोजच्या जाहीर सभेना त्यांना जनतेचा प्रतिसाद मिळत आहे. लिंबागणेश सर्कलच्या चऱ्हाटा येथील सभेसाठी अभूतपूर्व गर्दी झाली होती . बीड मतदार संघात पसरलेला अंधार दूर करण्यासाठी निवडणुकीच्या रिंगणात बॅटरी टॉर्च निवडणूक चिन्ह घेऊन उतरले आहे. लिंबागणेश सर्कल मध्ये लोकनेते विनायकराव मेटे साहेबांनी अनेक विकास कामे केली आहेत. हा बालाघाट परिसर साहेबांना मानणारा आणि त्यांच्या विचारांचा आहे. आणि येथील जनता माझ्या झोळीत मताचे दान टाकल्याशिवाय राहणार नाही असाही विश्वास त्यांनी व्यक्त केला. प्रसंगी शिवसंग्राम प्रदेश उपाध्यक्ष प्रभाकर कोलंगडे, शिवसंग्राम जिल्हाध्यक्ष नारायणराव काशीद , जिल्हा सरचिटणीस अनिल घुमरे, सचिन कोटुळे , कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक पंडित माने, ॲड मनीषा कुपकर, बबनराव उबाळे, अबा येळवे, हरी भोसले आदी उपस्थित होते.

# रमेश आडसकरांची दिंद्रुड येथे मोठी प्रचार फेरी

## आडसकर यांच्या बाजूने बहुसंख्य जनमत

दिंद्रुड । प्रतिनिधी

**माजलगाव तालुक्यातील दिंद्रुड हा माजलगाव, वडवणी, धारूर तालुक्याच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेला सदन भाग आहे. दिंद्रुड व तेलगाव जिल्हा परिषद गटातील लोकं बाजारहाट करण्यासाठी रविवारी दिंद्रुडला येतात याचे औचित्य साधून अनेक उमेदवारांनी दिंद्रुड येथे रविवारी रॅली व मतदार भेटीचे आयोजन केले होते. अपक्ष उमेदवार रमेश राव आडसकर यांनी सकाळी ११ वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौक ते गावभर मतदार व व्यापाऱ्यांच्या गाठीभेटी घेत बांधिलकी साधत मतदानाचे आवाहन केले.**



माजलगाव मतदार संघात रमेशराव आडसकर यांनी गेल्या दहा वर्षांपासून केलेल्या कामांचे व जोपासलेल्या हितसंबंधाचा फायदा आडसकर यांना या विधानसभा निवडणुकीत स्पष्टपणे दिसून येत आहे. गेल्या वेळेस अल्पशा: मताने पराभूत झालेल्या आडसकर यांना या निवडणुकीत विजयाची संधी असल्याच्या लोक भावना आहेत. दिंद्रुड येथे सकाळी ११ वाजता रमेशराव आडसकर यांच्यासह वाशी (मुंबई )बाजार समितीचे सभापती अशोकराव डक, अशोक कोमटवार, माजी उपसरपंच युवराज ठोंबरे, दत्तात्रय ठोंबरे, प्रदीप ठोंबरे, तेलगाव चे माजी सरपंच दीपक लगड, विठ्ठलराव लगड, सुलेख कलंत्री यांच्यासह शेकडो नागरिक आडसकर यांच्या प्रचारार्थ फेरीत सहभागी झाले होते. सहानुभूतीची लाट रमेशराव आडसकर यांच्या बाजूने असल्याने या निवडणुकीत त्याचा फायदा निश्चितच होणार असल्याचे गाव भेटीदरम्यान मतदार स्पष्टपणे व्यक्त करताना दिसत होते.

# गजानन साखर कारखाना गळीत हंगामाचा संत-महंतांच्या हस्ते शुभारंभ

बीड । प्रतिनिधी



शिक्षण एम.कॉम.वार्ताहर म्हणून दै. देवगिरी तरुण भारत मध्ये अंबडहुन पत्रकारिता सुरू केली तेथून दै. 'लोकप्रश्न'चा कार्यकारी संपादक म्हणून सक्रिय पत्रकारिता हा प्रवास.दरम्यान लोकमत, देवगिरी तरुण भारत,महाराष्ट्र टाईम्स, पार्श्वभूमीसाठी प्रतिनिधी म्हणून काम केले. उगवतीचे रंग या नावाच्या साप्ताहिकाचा कार्यकारी संपादकपद दीर्घकाळ सांभाळले. बीड जिल्हा मराठी पत्रकार संघाचा सलग चार वेळा जिल्हाध्यक्ष होतो तर शासनाच्या विभागीय अधिस्वीकृती समितीचा सदस्यही होतो. आता मुक्त पत्रकार म्हणून विविध दैनिकात लिहितो, सोशल मीडियावर पत्रकारितेत हाताळायला न मिळालेले विषय हाताळले आणि प्रचंड प्रतिसाद मिळाला आहे. राजकारण, खाद्यभ्रमंती, खेळ, संगीत, व्यक्तिविशेष हे माझे आवडते विषय. समाधान याचं आहे की मी 'व्यक्त व्हा!' ही मोहीम चालवली आणि अनेकजण खूप छान लिहायला लागले.विविध संस्थांनी उत्कृष्ट पत्रकारितेसाठी पुरस्कार देऊन मला गौरवीत केले. लिहायसारखे अजून भरपूर काही माझ्याकडे आहे ते लिहिण्यासाठी हे पोर्टल रुपी नवो माध्यम 'उगवतीचे रंग' सुरू केलंय, विश्वास आहे हे नक्कीच आवडेल.

# मतपत्रिका व्हायरल केल्याप्रकरणी सेवेतून निलंबन

बीड । प्रतिनिधी

**आष्टी विधानसभा मतदारसंघामधील टपाली मतपत्रिका क्रमांक १०११८६ सोशल मीडियावर व्हायरल केल्याप्रकरणी मुंबईच्या सशस्त्र पोलिस ताडदेव येथील पोलिस गणेश अशोक शिंदे यांना सेवेतून निलंबित करण्यात आले आहे.**

आष्टी विधानसभा मतदारसंघामधील टपाली मतपत्रिका क्रमांक १०११८६ सोशल मीडियावर व्हायरल झाली आहे व तशा तक्रारी इतर उमेदवारांनी केल्या आहेत. ही टपाली मतपत्रिका १८५-मलबार हिल विधानसभा मतदारसंघ, मुंबई येथील निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या अर्जानुसार (नमुना-१२) मुंबईच्या ताडदेव पोलिस ठाण्यातील पो.कॉ. गणेश अशोक शिंदे यांना निर्गमित करण्यात आली होती. विल्सन महाविद्यालय, नेताजी सुभाषचंद्र रोड,गिरगाव चौपाटी, चर्नी रोड, मुंबई येथील सुविधा केंद्रातील केंद्र क्रमांक ३ वरून त्यांनी टपाली मतपत्रिकेद्वारे मत नोंदविल्यानंतर त्यांच्या भ्रमणध्वनीमध्ये मतपत्रिकेचा फोटो काढून तो सोशल मिडियावर व्हायरल केला. त्यामुळे त्यांच्याविरूद्ध भारतीय न्याय संहिता कलम २२३ सह लोकप्रतिनिधी अधिनियम १९५१ चे कलम १२८ अन्वये बृहन्मुंबईतील गावदेवी पोलिस ठाण्यात शुक्रवार (ता.१५) रोजी गुन्हा नोंदविण्यात आला. सदरील घटनास्थळ मलबार, मुंबई येथील असल्यामुळे गुन्हा तेथे नोंदविण्यात आलेला आहे.

# संभाजी ब्रिगेड आणि अखिल भारतीय मराठा महासंघाचा डॉ.ज्योती मेटे यांना जाहीर पाठिंबा

बीड । प्रतिनिधी

**विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मागील काही दिवसांपासून सातत्याने चर्चेत असणाऱ्या बीड मतदारसंघातून डॉ. ज्योती विनायकराव मेटे यांना आज अखिल भारतीय मराठा महासंघ आणि संभाजी ब्रिगेडच्या वतीने पाठिंबा जाहीर करण्यात आला आहे. या दोन्ही संघटनाची मोठी फळी आता डॉ. ज्योतीताई मेटे यांच्या विजयासाठी काम करणार असल्याने डॉ. ज्योती विनायकराव मेटे यांची ताकद वाढली आहे.**



आज पर्यंत महाराष्ट्राने सामाजिक बांधिलकी जपली आहे. कोणतेही पक्ष किंवा संघटना असो या महाराष्ट्राने समाजासाठी काम करणाऱ्या नेत्याच्या निधनानंतर त्यांचा वारसा चालवणाऱ्यांच्या पाठीमागे उभा राहण्याची भूमिका दर्शवल्या आहेत. यात सर्वच पक्षांचा समावेश आहे. आज लोकनेते विनायकराव मेटे साहेब यांच्या दुर्दैवी निधनानंतर शिवसंग्राम ची संपूर्ण जबाबदारी स्वीकारणाऱ्या डॉ.ज्योती विनायकराव मेटे या २३० बीड विधानसभा मतदार संघातून अपक्ष उमेदवार आहेत. तेव्हा सामाजिक बांधिलकी जोपासत संभाजी ब्रिगेड आणि अखिल भारतीय मराठा महासंघ यांनी डॉ. ज्योती मेटे यांना पाठिंबा दर्शवला आहे. शिवसंग्रामच्या विचारधारा आणि संभाजी ब्रिगेड व अखिल भारतीय मराठा महासंघ यांची विचारधारा एकच असून भविष्यात मराठ्यांच्या ओबीसीत समावेश, बेरोजगारी, महिला सक्षमीकरण, शैक्षणिक धोरण, जुनी पेन्शन, आरोग्य धोरण, शेतकरी कष्टकरी,शिक्षक आणि विद्यार्थी यांच्या अडचणी दूर करण्यासाठी संभाजी ब्रिगेड आणि अखिल भारतीय मराठा महासंघ यांनी डॉ. ज्योती विनायकराव मेटे यांना २३० बीड विधानसभा मतदारसंघात जाहीर पाठिंबा दर्शवला आहे. अखिल भारतीय मराठा महासंघाचे आणि संभाजी ब्रिगेडचे डॉ. ज्योती मेटे यांनी आभार मानले आहेत.

# पान १ वरून...

### खुल्या बाजारात सोयाबीनचे

रुपयांचा दर कसा मिळेल, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. प्रक्रिया उद्योजकांकडे आधीच महागडी सोया पेंड पडून आहे. त्याच्या विल्हेवाटीचा प्रश्न गंभीर झाला आहे. त्यामुळे त्यांच्याकडून हा दर मिळणे अशक्यच आहे. परिणामी, सरकारलाच सहा हजार रुपयांनी सोयाबीनची खरेदी करावी लागणार असल्याचे सांगितले जाते. देशाचे एकूण सोयाबीन उत्पादन १२५ लाख टन इतके आहे.

-----------

### मुंडे बहिण-भाऊ ओबीसी उमेदवारांन

उमेदवारालाच मतदान करायचा निर्धार ओबीसी समाजाने केला. माजलगाव मतदार संघामध्ये माधव निर्मळ आणि बाबरी मुंडे हे दोन ओबीसी नेते निवडणुकीच्या मैदानात आहेत. बाबरी मुंडे यांना आपलं समर्थन नाही असं पंकजा मुंडे यांनी एका व्हिडिओच्या माध्यमातून जाहीर केलं. त्यामुळे माधव निर्मळ हे एकमेव नाव ओबीसी समाजाचे मुंडे कुटुंबाकडून समोर येतं. आष्टी मध्ये भीमराव धोंडे तर गेवराई मध्ये प्रियंका खेडकर या निवडणूक लढवत आहेत. आपूर यंत्र असताना सुद्धा भीमराव धोंडे सोडले तर माधव निर्मळ आणि प्रियंका खेडकर ह्या लढा देत आहेत. शिवाय मतदानाला अवघे दोन दिवस बाकी असताना मुंडे बहीण भाऊ बीड जिल्ह्यातील ओबीसी उमेदवारांना बळ देतात की वाऱ्यावर सोडतात याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे. मुंडे बहिण भावांनी माजलगावात माधव निर्मळ, आष्टी मध्ये भीमराव धोंडे आणि गेवराई मध्ये प्रियंका खेडकर यांच्यासाठी ओबीसी समाजाला स्पष्ट असा संदेश दिला तर या तीनही मतदार संघात ओबीसी आमदार होऊ शकतो, असं म्हटलं जात आहे. त्यामुळे मुंडे बहीण भावाच्या संदेशाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

-------------

### सुसंस्कृत उमेदवाराला मतदान

आवाहन केले. ते म्हणाले, जातीयतेच्या मुद्द्यावर आधारलेले राजकारण समाजाचा विकास रोखते. सोशल मीडियावर पसरवल्या जाणाऱ्या फेक संदेशांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहन करत त्यांनी सांगितले की, सध्याची निवडणूक ऐतिहासिक ठरणार आहे. २३ तारखेला घड्याळाचा गजर मुंबईपर्यंत पोहोचवण्यासाठी प्रत्येकाने जागरूक राहून मतदान करावे, असे ते म्हणाले. जयदत्त क्षीरसागर यांनी मतदारांना मागील अपयशी उमेदवारांकडून विकास, रोजगाराच्या संधी आणि प्रकल्प यांचा हिशोब मागण्याचे आवाहन केले. त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांवर आधारित लोकशाहीचा सन्मान राखत, योग्य उमेदवाराची निवड करण्याचे आवाहनही केले. या मेळाव्यात डॉ.योगेश क्षीरसागर यांच्यासह विलास बडगे, दिनकर कदम, सखाराम मस्के, आर.डी. गायकवाड, अनिल तुरुकमारे, अशोक हिंगे, गणेश वाघमारे, प्रमोद शिंदे, कपिल सोनवणे यांसारख्या मान्यवरांची उपस्थिती होती. पंचशील नगर व शाहूनगर येथील स्थानिक कार्यकर्ते, नागरिकही मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

------------

### मताच्या वेळी जात आठवते शिक्षण भरती

आपण करत असलेल्या ओबीसी विरुद्ध मराठा या जातीवादी प्रचाराला जनता बळी पडणार नसून आपला खरा पिक्चर जनतेसमोर येणार आहे आपण स्वतःला शिक्षण महर्षी समजतात शिक्षण संस्थेच्या माध्यमातून किती गरिबांना तुम्ही लवकर नोकरी दिल्या आपण आजची चिकन समजल्या जाणाऱ्या कडा कारखान्याचा पूर्ण सत्यनास केला व कामगारांच्या संसारात उध्वस्त केला अशा नेतृत्वाला जर जनतेने संधी दिली तर जनतेवर पश्चातापाची वेळ येणार आहे . तरी या विधानसभा निवडणुकीमध्ये भारतीय जनता पार्टीचे उमेदवार धस सुरेश रामचंद्र या खंबीर नेतृत्वाच्या पाठीशी उभा राहून आपल्या मतदारसंघाचा सार्वजनिक विकास करण्यासाठी सुरेश धस यांना प्रचंड मतांनी विजयी करा असे आवाहन माजी नगराध्यक्ष रंगनाथ धोंडे यांनी केले आहे.

-----------

### राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष- चिन्ह

होता. त्यानंतर न्यायालयाने याची पडताळणी करायला सांगितले होते. अजित पवारांनी आता स्वतःच्या पायावर उभे राहायला शिकले पाहिजे, असेही निरीक्षण सर्वोच्च न्यायालयाने याआधीच्या सुनावणीवेळी नोंदवले होते. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आणि चिन्ह प्रकरणी गेल्या बुधवारी सर्वोच्च न्यायालयात सुनावणी पार पडली. यावेळी हे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले.

-------------

### रमेश आडसकर सर्व जाती धर्माला सोबत

आयोजन करण्यात आले होते. या सभेस उमेदवार रमेश आडसकर,बहुजन विकास मोर्चाचे अध्यक्ष बाबुराव पोटभरे,मनोहर डाके,हरिभाऊ सोळंके, तन्मय होके यांची मुख्य उपस्थिती होती यावेळी मुजमिल पटेल यांनी मनोगतात निवडणूकीत रमेश आडसकरांच्या पाठीशी खंबीर उभे राहणार असल्याचे सूतोवाच केले. रमेश आडसकरांनी त्यांचें स्वागत करुन भविष्यात मूजमिल पटेलांना योग्य संधी व न्याय देणार असल्याचे सांगितले. या प्रसंगी बहुजन विकास मोर्चाचे अध्यक्ष बाबुराव पोटभरे यांनी मूजमील पटेलांनी योग्य भूमिका घेतली असुन रमेश आडसकर हे सर्व उमेदवारांत सरस आहेस असे सांगितले पुढे बोलताना त्यांनी विरोधकांवर कडक प्रहार केले तुतारीचा उमेदवार जातीवादी मानसिकतेचा असुन घड्याळीचा उमेदवार मनुवादी विचारसरणीचा आहे. दलित व मुस्लीम समाजाविषयी त्यांच्या मनात असलेला राग, आकस, द्वोष ते वेळोवेळी प्रदर्शित करतात. त्यांच्या तुलनेत रमेश आडसकर हे मोकळ्या स्वभावाचे असुन सर्व जाती धर्मातील लोकांना समान न्याय देण्याचे त्यांचें धोरण आवडत असल्याने त्यांना पाठिंबा देणाऱ्यांची रीघ लागली आहे. ते प्रचंड कार्यक्षम असुन मतदारसंघांच्या विकासासाठी तत्पर राहणार आहेत जनतेने विरोधकांच्या भुल थापांना बळी न पडता रमेश आडसकर सारखा धडाकेबाज तरुण युवकाला प्रचंड मतांनी निवडून द्यावं असे आवाहन बाबुराव पोटभरेंनी केले. या वेळी हनुमान चौकात आयोजित या सभेला शहर वासियांनी उस्फूर्त प्रतिसाद दिला.

------------

### वंचित पुरस्कृत अपक्ष उमेदवार

मधील गोपनीय शाखेत कार्यरत पोहेकॉ संतोष बदने यांनी शहर पोलिसात कायदेशीर फिर्याद दिल्यानंतर शैलेंद्र बाबुराव कांबळे, गोविंद खंडु मस्के, धम्मानंद रानबा कासारे, जयपाल विष्णु दहीवडे, सतिश पंडीत सोनवणे या सर्वांना अटक करून न्यायालयासमोर हजर केले असता न्यायालयाने त्यांना न्यायालयीन कोठडी सुनावल्याने सर्वांची रवानगी बीड कारागृहात करण्यात आली आहे.

----------

### नरेंद्र मोदींच्या राजवटीत फक्त उद्योगपती

प्रियांका गांधी यांनी केला. काँग्रेस मविआच्या उमेदवारांसाठी प्रियांका गांधी यांची गडचिरोलीमध्ये प्रचार सभा झाली. या सभेला प्रभारी रमेश चेन्नीथला, प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, छत्तीसगडचे माजी मुख्यमंत्री भूपेष बघेल, विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, खासदार नामदेव किरसान, प्रदेश उपाध्यक्ष संघटन व प्रशासन नाना गावंडे, रिपाईंचे नेते राजेंद्र गवई, गडचिरोली जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष महेंद्र ब्राम्हणवाडे, शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते उपस्थित होते. आपल्या भाषणातून भाजपा सरकारचा समाचार घेत प्रियांका गांधी म्हणाल्या की, पंडित जवाहरलाल नेहरु यांनी देशाचे हित पाहून मोठ्या संस्था, करखाने, बंदरे, शैक्षणिक संस्था, हॉस्पिटल्स विविध राज्यात उभी केली. विकासाच्या कामात काँग्रेस सरकारने कधीच भेदभाव केला नाही. परंतु मागील ११ वर्षांपासून देशात भेदभावाचे राजकारण सुरु झाले आहे. मोदी सरकारने महाराष्ट्रात येणारे मोठे प्रकल्प गुजरात व इतर राज्यात पळवून महाराष्ट्राशी भेदभाव- केला आहे. देशातील सर्व विमानतळ, बंदरे, कारखाने, जमीन एकाच उद्योगपतीला दिली आहेत. महाराष्ट्रात बेरोजगारी प्रचंड वाढलेली आहे, २.५ लाख सरकारी पदे रिक्त आहेत पण भरती केली नाही. कंत्राटी पद्धतीने नोकर भरती केली जात आहे. सर्वात जास्त तरुणांच्या आत्महत्या महाराष्ट्रात होत आहेत. शेतकरी संकटात आहे, त्याच्या शेतमालाला भाव मिळत नाही, कापसाची मोठ्या प्रमाणात आयात करुन शेतकऱ्यांच्या कापसाचे भाव वाढू दिले नाहीत. १० वर्षापासून सोयाबीनचा दर वाढलेला नाही. काँग्रेस सरकार असताना सोयाबीनला ७ ते ८ हजार रुपये भाव होता आज तो फक्त ४ हजार रुपये आहे. कांदा निर्यातबंदी केली होती, त्यामुळे ५० लाख टन कांदा बाद झाला, दूधाला भाव नाही, संत्र्याला भाव नाही. शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढत नाही आणि शेती साहित्यावर मात्र जीएसटी लावून शेतकऱ्याला लुटले जात आहे. शाळेसाठी लागणाऱ्या वस्तूंवरही जीएसटी लावला आहे. आदिवासांचे हक्क अबाधित राखण्यासाठी काँग्रेस सरकारने पेसा कायदा बनवला. आज भाजपाच्या राज्यात आदिवासींवर अत्याचार होत आहेत. महाराष्ट्रातील ४ लाख आदिवासींनी जमिन पट्ट्यांसाठी अर्ज केले त्यातील २ लाख बाद करण्यात आले. तर देशभरातून २२ लाख आदिवासींचे अर्ज बाद केल्याचा आरोपही यावेळी केला. प्रियांका गांधी पुढे बोलताना म्हणाल्या की, महाराष्ट्रातील सरकार मोदी व भाजपाने चोरले. सरकार स्थापनेच्या बैठकीत उद्योगपती अदानी उपस्थित होते अशी चर्चा बाहेर आली आहे. आता विधानसभा निवडणुकीत काळजीपूर्वक मतदान करा उद्योगपतींच्या हितासाठी काम करणारे नाही तर जनतेसाठी काम करणारे सरकार निवडून द्या, असे आवाहनही केले.

------------

### 'वोट,कटवा' भूमिकेतील उमेदवाराला

आमदार होतो अशी परिस्थिती असून या विधानसभा निवडणुकीमध्ये मी त्या पक्षाच्या उमेदवारीचा प्रबळ दावेदार असूनही शरद पवार साहेबांनी माझा केसाने गळा कापल्यामुळे मला उमेदवारी मिळाली नाही त्यानंतर आम्ही ज्येष्ठ कार्यकर्ते एकत्रित बसून सुरेश धस यांना पाठिंबा जाहीर केला आहे आष्टी पाटोदा आणि शिरूर या विधानसभा मतदारसंघातील पुढील कार्यकाळातील विकास कामा च्या अंमलबजावणीसाठी आणि मतदारसंघाच्या उज्वल भवितव्यासाठी सुरेश धस यांना मदत करण्याचा निर्णय आम्ही घेतला आहे आष्टी पाटोदा आणि शिरूर तालुक्यातील जनतेचा सुरेश धस यांना वाढता पाठिंबा असून गेल्या दहा वर्षातील दोन्ही आमदारांचा कारभार पाहून लोकांनी यावेळी माहोल बदलण्याचा निर्णय घेतला असून सुरेश धस यांच्याशिवाय आष्टी पडत आणि शिरूर तालुक्यातील सर्वसामान्य नागरिक यांच्यासह ऊसतोड कामगार दलित शोषित या समाजासाठी सामाजिक सुखदुःखात सामील होणाऱ्या सुरेश धस यांना विधानसभेत पाठवण्याचा निर्णय लोकांनीच निवडणूक हातात घेऊन केलेला आहे असे दिसून येत आहे असेही ते शेवटी म्हणाले. यावेळी दौलावडगावचे मा.उपसरपंच बबलू शेठ कुरेशी, मिरा मामु शेख, ताज खान यांच्यासह सुलेमान देवळा येथील विनायक आप्पाजी घोडके (माजी सरपंच), बाळासाहेब रामभाऊ तोरडमल,ग्रामपंचायत सदस्य यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी सुरेश धस यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत भारतीय जनता पक्षामध्ये जाहिर प्रवेश केला. सुरेश धस यांनी लोणी जि.प.गट मारुती मंदिर,लोणी सय्यदमीर,दौलावडगाव जि.प. गट,हनुमान मंदिर, दौलावडगाव सुरुडी पं.स.गण सुरुडी फाटा,डोईठाण,पाटोदा शहर व वाडी/वस्ती यांनी या गावांना गट आणि गावनिहाय हाऊसफुल बैठकीत घेतल्या. या प्रसंगी भारतीय जनता पार्टी, शिवसेना, रिपाई (आठवले गट) व मित्रपक्षांचे पदाधिकारी, दौलावडगाव जि. प. गटातील नागरिक, युवक व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

-----------

cmyk

राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

सोमवार दि. १८ नोव्हेंबर २०२४



# सोशल मीडियावर मतपत्रिका व्हायरल केल्याप्रकरणी गुन्हा नोंद

**बीड । प्रतिनिधी**

आष्टी विधानसभा मतदारसंघामधील टपाली मतपत्रिका क्रमांक १०११८६ सोशल मीडियावर व्हायरल झाली आहे व तशा तक्रारी इतर उमेदवारांनी केल्या आहेत. ही टपाली मतपत्रिका १८५-मलबार हिल विधानसभा मतदारसंघ, मुंबई येथील निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या अर्जानुसार (नमुना-१२) मुंबईच्या ताडदेव पोलिस ठाण्यातील पो.कॉ. गणेश अशोक शिंदे यांना निर्गमित करण्यात आली होती. विल्सन महाविद्यालय, नेताजी सुभाषचंद्र रोड,गिरगाव चौपाटी, चर्नी रोड, मुंबई येथील सुविधा केंद्रातील केंद्र क्रमांक ३ वरून त्यांनी टपाली मतपत्रिकेद्वारे मत नोंदविल्यानंतर त्यांच्या भ्रमणध्वनीमध्ये मतपत्रिकेचा फोटो काढून तो सोशल मिडियावर व्हायरल केला. त्यामुळे त्यांच्याविरूद्ध भारतीय न्याय संहिता कलम २२३ सह लोकप्रतिनिधी अधिनियम १९५१ चे कलम १२८ अन्वये बृहन्मुंबईतील गावदेवी पोलिस ठाण्यात शुक्रवार (ता.१५) रोजी गुन्हा नोंदविण्यात आला आहे. सदरील घटनास्थळ मलबार, मुंबई येथील असल्यामुळे गुन्हा तेथे नोंदविण्यात आला, असे आष्टीच्या निवडणूक निर्णय अधिकारी वसिमा शेख यांनी कळविले आहे.

# मानवी वस्तीत काळाकुट्ट अंधार मात्र कब्रस्तानात झगमगाट

## अल्पसंख्याक विकास पायाभूत सोयीसुविधा ग्रामस्थांसाठी की कार्यकर्ते पोसण्यासाठी: डॉ.गणेश ढवळे

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य शासनामार्फत राज्यातील अल्पसंख्याक बहुल ग्रामीण क्षेत्रात मुलभूत, पायाभूत सुविधा अल्पसंख्याक विकास विभागामार्फत अल्पसंख्याक समुहाला समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी विविध योजना राबविण्यात येतात. राज्यातील ज्या ग्रामपंचायतीच्या एकुण लोकसंख्येपैकी अल्पसंख्याक समुहाची ( मुस्लिम, ख्रिश्चन,शीख, बौद्ध, जैन,पारसी) लोकसंख्या किमान १०० किंवा त्यापेक्षा जास्त आहे.अशा अल्पसंख्याक बहुल ग्रामपंचायतींना कब्रस्तान,स्मशान किंवा अंत्यविधीच्या जागेसाठी संरक्षण भिंत ( ४ फुट उंच व १ फुट रूंद) पाणी सुविधा, विद्युत पुरवठा व अंतर्गत ३ फुट रुंदीचा रस्ता तसेच सार्वजनिक सभागृह , पिण्याच्या पाण्याची सुविधा, विद्युत पुरवठा,ईदगाह , सांड पाण्याची व्यवस्था , अंतर्गत रस्ते, सार्वजनिक स्वच्छतागृहे, पथदिवे यासाठी जिल्हा नियोजन निधीतून ग्रामपंचायतींना २० लाख रुपयांपर्यंत अनुदान उपलब्ध करून देण्यात येते. मात्र ग्रामीण भागातील बहुतांश ठिकाणी अल्पसंख्याक समाजातील मानवी वसाहतीत




काळा कुट्ट अंधार दिसत असुन याच ठिकाणी कब्रस्तानात मात्र दिव्यांचा झगमगाट दिसुन येतो.याचवेळी काही गावांमध्ये आवश्यकता नसताना जास्तीचे दिवे लावण्यात आल्याचे आढळून आले आहे.त्यामुळे अल्पसंख्याक विकास पायाभूत सोयीसुविधा ग्रामस्थांसाठी की पुढा-यांचे कार्यकर्ते पोसण्यासाठी असा सवाल सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी उपस्थित केला आहे.

मंदिराच्या ठिकाणी लावलेले सौरऊर्जा पथदिवे निकृष्ट दर्जाचे आणि बंद पडलेल्या अवस्थेत:- डॉ.गणेश ढवळे

शासनाने मोठा गाजावाजा करून सुरू केलेल्या सौर पथदिव्यांपैकी ७५ टक्के पथदिवे निकृष्ट दर्जाचे असल्याने बंद आहेत.थकीत वीजबिलांमुळे ग्रामपंचायती मेटाकुटीला आल्याने कमी लोकसंख्येच्या व भौगोलिक परीसर मोठा असलेल्या गावांना कर कमी येत असतो. वीज देयके आधिक थकल्याने थकबाकीचा फुगवटा वाढतच जातो.यावर उपाय म्हणून शासनाने सौरऊर्जा पथदिवे प्रकल्प गावोगावी राबविण्यात आले. धार्मिक स्थळे तसेच गावातील मुख्य चौकात लावण्यात रस्त्यावरील सौर पथदिवे खांब शोभेच्या वस्तू झाल्या आहेत. पुढा-यांनी स्थानिक कार्यकर्ते पोसण्यासाठी दिलेल्या सौर पथदिवे निकृष्ट दर्जाचे असल्याने महिना -दोन महिन्यात बंद पडलेल्या अवस्थेत असुन ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना तथा ग्रामविकास अधिकारी यांना विचारणा केल्यास दुरुस्तीसाठी पाठवल्याचे उत्तर मिळते मात्र वर्ष उलटूनही अद्याप दुरुस्ती न झाल्याचे प्रकार सुद्धा ग्रामस्थांना नविन नाहीत.याबद्दल ग्रामस्थांनी तिव्र नाराजी व्यक्त केली आहे.

# आष्टी मतदारसंघात जरांगे पाटलांच्या समर्थकांचा कोणाला मिळणार पाठींबा?

**आष्टी । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील सर्वात मोठा मतदारसंघ २३१ आष्टी विधानसभा मतदारसंघ असून या मतदारसंघात मराठा योद्धा मनोजदादा जरांगे पाटील यांचे समर्थक तथा विधानसभेतील इच्छुक उमेदवार कोणत्या उमेदवाराला पाठिंबा देणार ? हे मात्र अजून समजलेले नाही. त्यामुळे या मतदारसंघात जरांगे पाटलांच्या समर्थकांचा ज्या उमेदवाराला पाठिंबा असेल. तो उमेदवार विजयी होईल. असे बोलले जात आहे.



सध्या महाराष्ट्र विधानसभेच्या प्रचाराची रणधुमाळी चालू असून पक्षाचे व अपक्षांचे उमेदवार मतदारांच्या दारोदारी जावून मतदान करण्याचे आवाहन करत आहेत. मराठा योद्धा मनोजदादा जरांगे पाटील यांनी निवडणूक न लढविता ११३ उमेदवार पाडण्याचे आवाहन केले आहे. त्यामुळे आष्टी पाटोदा शिरूर कासार तालुक्यातील जरांगे पाटील समर्थकांनी दाखल केलेले उमेदवारी अर्ज मागे घ्यावेत असे सांगितल्याने समाजसेवक सुरेश पाटील सह आष्टी, पाटोदा, शिरूर तालुक्यातील समर्थकासह आदींनी दाखल केलेले उमेदवारी अर्ज मागे घेतले. दादांनी निवडणूक न लढविण्याचा घेतलेला निर्णय आणि आरक्षणाला विरोध करणाऱ्या उमेदवारांना पाडण्याचा निर्णय घेतल्याने आष्टी मतदारसंघातील समर्थक कोणाला पाठिंबा देतील ? मराठा योध्दा मनोज दादांचे समर्थक व इच्छुक उमेदवार ज्या पक्षाच्या किंवा अपक्षांच्या उमेदवाराला पाठिंबा व समर्थन देतील तो उमेदवार विजयी होणार असे आष्टी मतदार संघात बोलले जात आहे. त्यामुळे कोणते उमेदवार पाडायचे आणि कोणाला निवडून आणायचे हे भविष्यात समजेल. आता कसं पाटील म्हणतील तसं. आष्टी मतदारसंघातील जरांगे पाटील समर्थक तथा समाजसेवक सुरेश पाटील यांनी सांगितले की, मनोज दादांनी सांगीतल्याप्रमाणे आरक्षणाला विरोध करणारे आणि मराठा समाजाला फसवनारे यांचा सुपडा साफ करावाच लागेल.

# धनंजय मुंडे - पंकजा मुंडे यांच्याकडून कामे करून घेऊन निवडणुकीत इतरांची कामे करणाऱ्यांची यादी वाल्मीक अण्णांना देणार - भागवत दराडे

**दिंद्रुड । प्रतिनिधी**

सध्या निवडणुकीचे वातावरण तापले आहे, यातच काही कार्यकर्ते सकाळी एका नेत्याला, दुपारी दुसऱ्या नेत्याला तर सायंकाळी तिसऱ्या नेत्याला आम्ही तुमच्या निवडणुकीत तुमचे काम करतो म्हणून पळत आहेत. कृषिमंत्री धनंजय मुंडे व लोकनेते पंकजाताई मुंडे यांच्याकडून स्वतःची व गावाची कामे करून घेऊन स्वतःची पोळी भाजलेल्या अशा कार्यकर्त्यांनी ऐन निवडणुकीच्या तोंडावर साथ सोडली असून अशा कार्यकर्त्यांची नावे पुराव्यानिशी वाल्मीक अण्णा कराड यांना सादर करणार असल्याचे युवा नेते भागवत दराडे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे सांगितले आहे.

माजलगाव विधानसभा मतदारसंघातील बहुतांश गावात कृषिमंत्री धनंजय मुंडे साहेब व पंकजाताई मुंडे यांची कार्यकर्ते मंडळी आहेत. कित्येक वर्षांपासून स्वतःची झोळी नेत्यांकडून भरून घेणाऱ्या व ऐन निवडणुकीत धनु भाऊ व पंकजाताई यांच्या मिठाला न जागणाऱ्या कार्यकर्त्यांनी अपक्ष अनेक उमेदवारांच्या खेम्यात दाखल होत धनंजय मुंडे व पंकजाताई यांना धोका दिला आहे. अशा नमक हराम कार्यकर्त्यांची फोटो माझ्याकडे उपलब्ध असून लवकरच वाल्मीक अण्णा कराड यांना ती सादर केल्या जाणार असल्याचे युवा नेते भागवत दराडे यांनी माध्यमांना सांगितले आहे. रविवारी दिंद्रुड येथील अक्षरा लॉन्स ला पत्रकार परिषदेत ते बोलत होते. वाल्मीक अण्णा कराड हे धनु भाऊ सांगतील त्याप्रमाणे प्रत्येक कार्यकर्त्याला आर्थिक, मानसिक आधार देण्याचे काम करतात. सुखदुःखात धावून येतात मात्र धोका देणाऱ्या कार्यकर्त्यांची गय केल्या जाणार नाही असे वाल्मीक कराडांनी सांगूनही त्यांचा आदेश न पाळणाऱ्या कार्यकर्त्यांना भविष्यात परळीची पायरी बंद असल्याचा वाल्मीक कराड यांनी घेतलेला निर्णयाचे आपण स्वागत करत असल्याचे भागवत दराडे यांनी याप्रसंगी सांगितले.

# अर्जुनराव खोतकर यांनाच विक्रमी मतांनी निवडून द्या -रावसाहेब दानवे

**जालना । प्रतिनिधी**

जालना भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी, रिपाई युती अभेद्य असून महायुतीचे सरकार येण्यासाठी एक एक आमदार महत्त्वाचा आहे. त्यामुळे कोणत्याही अफवावर विश्वास न ठेवता महायुतीचे अधिकृत उमेदवार अर्जुनराव खोतकर यांनाच विक्रमी मतांनी निवडून द्या असे आवाहन भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब पाटील दानवे यांनी केले. जालना येथील हॉटेल गॅलेक्सी मध्ये भारतीय जनता पक्षाच्या वतीने एक कार्यकर्त्यांचा मेळावा आयोजित करण्यात आला होता. या मेळाव्यास ज्येष्ठ नेते रावसाहेब पाटील दानवे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी शिवसेनेचे नेते माजी राज्यमंत्री अर्जुनराव खोतकर, भाजपचे जिल्हाध्यक्ष बद्रीनाथ पठाडे, उपाध्यक्ष भास्करराव दानवे, राजेश राऊत, सिद्धिविनायक मुळे, रामेश्वर भांदर्गे, सतीश जाधव ,कपील दहेकर ज्ञानेश्वर ढोबळे , सुहास मुंडे,शिकांत घुगे, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे, अनिरुद्ध



खोतकर, मेघराज चौधरी, विष्णू पाचफुले यांच्यासह भाजप शिवसेना राष्ट्रवादी त्रिपाई युतीचे प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी भाजप कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना ज्येष्ठ भाजप नेते रावसाहेब पाटील दानवे म्हणाले की, राज्यात भाजप शिवसेना राष्ट्रवादी रिपाई युतीची महायुती आहे. महाराष्ट्रात पुन्हा महायुतीचे सरकार आणायचे आहे. त्यासाठी महायुतीला एक एक आमदारही अत्यंत महत्त्वाचा आहे. त्यामुळे महायुतीचे सर्व पदाधिकारी नेते एक दिलाने प्रचारात सक्रिय सहभागी झालेले आहेत. भोकरदन विधानसभा मतदारसंघात नुकताच शिवसेनेचा मेळावा पार पडला. या मेळाव्यास शिवसेनेचे जिल्हा संपर्कप्रमुख पंडितराव भुतेकर, जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे आदी पदाधिकारी उपस्थित होते. तसेच बदनापूर येथे भाजपचे उमेदवार नारायण कुचे यांच्या प्रचार कार्यालयाच्या उद्घाटन प्रसंगी शिवसेनेचे नेते माजी राज्यमंत्री अर्जुनराव खोतकर हे स्वतः उपस्थित होते. जिल्ह्यातच नव्हे तर राज्यातही महायुती अभेद्य आहे. निवडणुकीच्या दरम्यान विरोधक वेगवेगळ्या अफवा पसरवतील. त्यामुळे विरोधकावर विश्वास न ठेवता महायुतीचे अधिकृत उमेदवार श्री अर्जुनराव खोतकर यांनाच विक्रमी मतांनी निवडून द्या. अर्जुनराव खोतकर यांना सर्व समाजघटकातून मिळत असलेला पाठिंबा आणि समर्थन पाहता त्यांचा विजय निश्चितपणे होणार आहे. त्यामुळे महायुतीच्या कार्यकर्त्यांनी कोणत्याही अफवेला बळी न पडता अर्जुनराव खोतकर यांनाच निवडून द्यावे. कोणी खोटा प्रचार करीत असेल तर त्यास जाब विचारावा व पक्ष नेत्यांच्या लक्षात आणून द्यावे असे आवाहनही माजी केंद्रीय मंत्री श्री. दानवे यांनी केले.

झाले गेले गंगेला मिळाले - खोतकर

यावेळी बोलताना उमेदवार श्री. अर्जुनराव खोतकर म्हणाले की, मागे जे झाले ते गंगेला मिळाले. आमच्या दोघांच्याही चुका होत्या आणि दोघांनाही जखमा झाल्या होत्या. यापुढे आम्ही कधीच अशा चुका होऊ देणार नाही. आगामी निवडणुका या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या म्हणजे कार्यकर्त्यांच्या असणार आहे. त्यामुळे आम्ही एक दिलाने प्रयत्न करणार आहोत. महायुतीच्या कार्यकर्त्यांनी एकदिलाने जिल्ह्यातील सर्व जागा निवडून आणाव्यात असे आवाहन श्री खोतकर यांनी केले.

# निराधाराचा आधार वर्दीतील दानवीर पीएसआय सुर्यकांत राजुभाऊ गुळभिले- श्याम पिंपळे

## निराधारांचा पाल्य म्हणून पीएसआय राजुभाऊ गुळभिले यांनी केले १८ निराधारांचे अंत्यसंस्कार विधी

**बीड । प्रतिनिधी**

निराधाराना मदत केली पाहिजे असे सर्वांनाच वाटते पण बोटवर मोजण्या इंतकचे लोक असतात ज्यांना वाटते की निराधारांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न करीत असतात. त्या मोजक्या पैकी एक म्हणजे बीडचे भुमीपुत्र पीएसआय सूर्यकांत उर्फ राजू गुळभिले .. गेल्या अनेक वर्षापासून बीड येथील जिव्हाळा निराधार केंद्राच्या माध्यमातून निराधाराची सेवा करणारे पीएसआय राजुभाऊ यांनी



वर्दीतील दानवीराचे रूप दाखवले असून दर महिन्याला स्वतः निराधारांची दाढी कटिंग करतात तर आत्तापर्यंत १८ निराधारचा पाल्य बनवून त्यांच्यावर अंत्यसंस्कार विधी राजु भाऊ गुळभिले यांनी केले आहेत. इतकेच नव्हे तर कुठलाही सणसुद असो किंवा पारिवारिक कार्यक्रमा असो राजुभाऊ निराधारासोबतच साजरी करतात.. आपल्या सर्व मित्रांना युवकांना प्रेरित करतात की वाढदिवसाचा व्यर्थ खर्च न करता निराधारांना उपयोगी येणाऱ्या वस्तू जिव्हाळा निराधार केंद्रात आणून द्याव्यात त्यांच्या या कार्यामुळे जिल्हाभरच नव्हे तर महाराष्ट्रभर पोलीस खात्याची प्रतिमा उंचावली आहे. काल त्यांनी केलेली मदतीची अशीच एक घटना आपल्या समोर मांडत आहे.

जिव्हाळा परिवारातील छोटी मुलगी नताशा या छोट्याशा बाळाची प्रकृती बरी नव्हती. बाळाच्या आईकडे तिला दवाखान्यामध्ये घेऊन जाण्यासाठी पैसे नव्हते. जिव्हाळा केंद्राच्या जवळ असलेल्या दवाखान्या मध्ये डॉक्टर कोटेजा मॅडम यांनी बाळाची मोफत तपासणी केली. आणि बाहेरून औषधी लिहून दिल्या. सदर औषधी १००० रुपये इतक्या रकमेच्या होत्या. ही बाब जिव्हाळा परिवाराचे स्नेही आणि सतत मदतीला धावून येणारे पोलीस खात्यामध्ये अविरत सेवा करणारे पी.एस.आय. राजूभाऊ गुळभिले यांच्या लक्षात आली त्यांनी ताबडतोब औषधाची चिठ्ठी मोबाईलवर मागून घेतली आणि सरळ औषध घेऊन बेघर निवारा केंद्रामध्ये येऊन बाळाची अस्थिने चौकशी करून औषधे दिले. पोलीस खात्यातील या दिलदार समाजसेवकाचे रूप पाहून त्या बाळाच्या आईचे डोळे भरून आले ... आणि त्या आईने जिव्हाळा परिवाराकडून पीएसआय राजु भाऊ गुळभिले यांची मनापासून आभार आणि त्यांच्या कार्यास प्रचंड शुभेच्छा.

पान ६ वरून...

## रमेश आडसकर यांच्या

पार्टी ऑफ इंडियाचे बीड जिल्हा अध्यक्ष विजय साळवे यांनी जातीयवादी शक्तींना रोखण्यासाठी माजलगाव मतदार संघाचे अपक्ष उमेदवार रमेश अडसकर यांना पाठिंबा दिला नंतर प्रत्यक्ष मतदार संघातील गावोगावी खेड्यापाड्यात वाडी तांड्यावर जाऊन प्रचार दौरे केले असता रमेश आडसकर यांचा विजयावर आजच शिक्का मोर्तब झाल्याचा आत्मविश्वास विजय साळवे यांनी व्यक्त केला आहे.

## बीडमध्ये संदीप क्षीरसागरांची

संदीप क्षीरसागर यांची मतदार संघात असलेली लोकप्रियता मोमीनपुरा येथील बैठकीला झालेल्या गर्दीतून दिसून आली. शनिवारी (दि.१६) रात्री आ. संदीप क्षीरसागर, माजी आ. सय्यद सलीम, जावेद कुरेशी, शिवसेना जिल्हाप्रमुख गणेश वरेकर आदी मान्यवरांच्या उपस्थितीत मोमीनपुरा भागात कॉर्नर बैठक संपन्न झाली. यावेळी आ. संदीप क्षीरसागर इतर मान्यवरांचे मोमीनपुरा भागातील युवकांनी जल्लोषात स्वागत केले. युवकांचा जोश आणि जल्लोष येणाऱ्या २० तारखेच्या मतदानातून नक्कीच दिसेल असा विश्वास आ. संदीप क्षीरसागर यांनी व्यक्त केला.उपस्थितांशी संवाद साधताना आ. संदीप क्षीरसागर म्हणाले, तुमच्या या प्रेमाने मी भारावून गेलो आहे. बीड मतदारसंघातील जनता हीच माझी खरी ताकद आहे. आपण कायम आदरणीय पवार साहेबांच्या विचाराने वाटचाल करणार असून आपल्या भूमिकेसोबत आज अनेक जण उभे राहत आहेत. आपला पक्ष अडचणीत असताना तुम्ही मला जी साथ दिली, त्यामुळेच आज आपण पुन्हा एकदा पक्षाची भूमिका घेऊन निवडणुकीत सामोरे जात आहोत.या निवडणुकीमध्ये मतदार संघाच्या विकासाचे मुद्दे घेऊन आपण प्रचार पुढे नेत आहोत. मागील पाच वर्षात मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करताना विकासाच्या अनेक योजना राबवल्या.अनेक प्रश्न मार्गी लागले. जनतेचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी आणि बीड मतदार संघाला सर्वांगीण विकसित करण्यासाठी आपण येत्या काळात काम करणार आहोत. मतदार संघातील काही प्रश्न प्रलंबित आहेत, त्यासाठी आपल्या सर्वांचे आशीर्वाद मला हवे आहेत. आज या बैठकीच्या माध्यमातून तुम्ही माझ्यावर जो विश्वास दाखवला आणि मला आशीर्वाद दिला आहे. या विश्वासाला मी कधीही तडा जाऊ देणार नाही. आपण सर्वांनी येत्या बुधवारी दि.२० नोव्हेंबरला आपण अनुक्रमांक ३ तुतारी वाजवणारा माणूस या चिन्हासमोरील बटन दाबून प्रचंड मतांनी विजयी करावे असे आवाहन आ. संदीप क्षीरसागर यांनी यावेळी केले. याप्रसंगी माजी आ.सय्यद सलीम शिवसेना जिल्हाप्रमुख गणेश वरेकर, जावेद कुरेशी यांच्यासह इतर प्रमुख पदाधिकारी यांनी मनोगत व्यक्त करत हा संदीप क्षीरसागर यांच्या पाठीशी मतांची ताकद उभी करावी असे आवाहन मतदारांना केले.

## डॉक्टरांच्या समस्यांबाबत डॉक्टरांचा

वैद्यकीय महाविद्यालये राष्ट्रवादी काँग्रेसच्या शासनाच्या कार्यकाळातच अस्तित्वात आली आहेत. यापुढील काळात अंबाजोगाई शहरात मेडिकल हब उभारण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस डॉक्टर सेल प्रयत्नशिल असणार आहे. ३०० च्यावर डॉक्टरांच्या पदोन्नतीसाठी माजी आमदार पृथ्वीराज साठे यांनी आवाज उठवून तो पूर्णत्वाकडे नेला. त्यामुळे येणाऱ्या विधानसभेत देखील पृथ्वीराज साठे यांच्या पाठीशी आपल्या डॉक्टरांची खंबीरपणे साथ उभा करण्याचे आवाहन डॉ नरेंद्र काळे यांनी या संवाद मेळाव्यात उपस्थित सर्व डॉक्टरांना केले. डॉक्टरांच्या संवाद मेळाव्यात बबन लोमटे यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. पृथ्वीराज साठे यांच्यामध्ये काम करण्याची सचोटी आहे. तेव्हा शहरातील सर्व डॉक्टरांनी पृथ्वीराज साठे यांना साथ देऊन त्यांना भारी बहुमताने विजयी करण्याचे आवाहन बबन लोमटे यांनी केले. माजी आमदार संगीता ठोंबरे यांनी पृथ्वीराज साठे व राष्ट्रवादी काँग्रेसच्या माध्यमातून मतदार संघातील माता भगिनींच्या मूलभूत प्रशांची उकल करण्यासाठी विधान भवनात प्रयत्न करणार असल्याचे अश्वसित केले. काही लोकांच्या दडपणाखाली येऊन ग्रामीण भागातील शासकीय रुग्णालयात रुग्णांची जात, धर्म व गट विचारून त्याच्यावर उपचार केले जातात हे अतिशय निंदनीय बाब असल्याचे माजी आमदार संगीता ठोंबरे यांनी नमूद केले. डॉक्टर संवाद मेळाव्यात राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष राजकिशोर मोदी यांनी सांगितले की पृथ्वीराज साठे हा एक चळवळीचा कार्यकर्ता आहे. त्यामुळे येणाऱ्या काळात ते अतिशय चांगल्या पद्धतीने काम करून सर्वसामान्य मतदारा सोबत डॉक्टरांचे प्रश्न देखील अतिशय उत्तम रित्या सोडविण्यासाठी प्रयत्नशील असतील असा विश्वास राजकिशोर मोदी यांनी उपस्थित सर्व डॉक्टर बांधवाना दिला. केज मतदार संघातील अनेक मतदार त्यांना व्होट सोबत नोट देखील देत आहेत. यावरून साठे यांची लोकप्रियता व विद्यमान आमदार यांच्या विरोधातील चीड दिसून येत आहे. महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार पृथ्वीराज साठे यांनी देखील आपल्या भावना व्यक्त केल्या. आपल्या अडीच वर्षाच्या अल्पशा कार्यकाळात आपल्या मतदारसंघासोबतच राज्यातील चांगल्या वैद्यकीय शिक्षण तथा वैद्यकीय सेवेसाठी प्रयत्न केले. अंबाजोगाई शहरात मराठवाड्यातील सर्वात मोठी रक्तपेढी मंजूर करून ती कार्यान्वित केली. येथे व्हेंटिलेटर मशीनचा अभाव होता तेव्हा सहा व्हेंटिलेटर स्वा रा ती रुग्णालयात उपलब्ध केले.अनेक डॉक्टरांना कायमस्वरूपी करण्याचे काम आपल्या अल्पशा कार्यकाळातच झाल्याचे अभिमानाने साठे यांनी सांगितले. त्याचबरोबर अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची मर्यादा ५० वरून १०० वर नेण्यासाठी आपण यशस्वी झाल्याचे सांगताना त्यापुढेही आपण या मतदारसंघातील सर्व ग्रामीण रुग्णालये अत्याधुनिक करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे आश्वासन या डॉक्टरांच्या संवाद मेळाव्यात पृथ्वीराज साठे यांनी देतांना आपण ही आपली मतदान रुपी ताकत माझ्यासारख्या सर्वसामान्य कार्यकर्त्यांच्या पाठीशी उभी करण्याची विनंती याप्रसंगी महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार पृथ्वीराज साठे यांनी उपस्थित सर्व डॉक्टर बांधवाना केली. डॉक्टरांच्या या संवाद मेळाव्याचे बहारदार सूत्रसंचलन सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ञ डॉ राजेश इंगोले यांनी केले. आपल्या सूत्र संचलनात त्यांनी अनेक शेरोशायरीचा आधार घेत डॉक्टर व वैद्यकीय क्षेत्रातील विविध प्रश्नांवर प्रकाश टाकला . डॉक्टर बांधवांच्या विविध समस्या यापुढील काळात पृथ्वीराज साठे हे विधानभवनात मांडून त्या सोडवतील अशी आशा या मेळाव्याच्या माध्यमातून केली. यासाठी अंबाजोगाई शहरातील सर्व डॉक्टर आपल्या पाठीशी खंबीरपणे उभा राहतील असा शब्द पृथ्वीराज साठे यांना सर्व डॉक्टरांच्या वतीने दिला.या संवाद मेळाव्यास अंबाजोगाई डॉक्टर असोसिएशनचे सर्व डॉक्टर मोठ्या प्रमाणावर सहभागी झाले होते.यावेळी संघटनेचा आरोग्य जाहीरनामा महाविकास आघाडीचे उमेदवार पृथ्वीराज साठे यांना देण्यात आला.

## राजकीय नेते, स्टार

त्या मतदार संघाचे मतदार नसलेल्या राजकीय नेते तसेच स्टार प्रचारक इत्यादींनी त्या मतदार संघात उपस्थित राहु नये व अशा राजकीय व्यक्तींनी व स्टार प्रचारकांनी प्रचाराचा कालावधी समाप्त होताच तो मतदार संघ सोडावा असे निवडणूक आयोगाचे दि. ८.१.२००७ रोजीचे आदेश आहेत. ९९- परतूर, १००- घनसावंगी, १०१- जालना, १०२- बदनापूर, १०३ - भोकरदन या विधानसभा मतदारसंघातील मतदार नसलेले सर्व राजकीय पदाधिकारी, पक्ष कार्यकर्ते, प्रचाराची धुरा सांभाळणारे सर्व व्यक्ती व प्रचाराकरीता आलेले स्टार प्रचारक हे कायद्यानुसार निर्धारित निवडणूक प्रचाराचा कालावधी संपल्यानंतर संबंधित विधानसभा मतदार संघात राहिल्यास त्यांच्याकडून प्रचार मोहिम राबविली जाण्याचा संभव आहे.

सदर आदेश दि. १८ नोव्हेंबर २०२४ रोजीचे सायंकाळी ६ वाजेपासुन ते दि. २० नोव्हेंबर रोजीचे रात्री १२ वाजेपर्यंत अंमलात राहील. जालना जिल्ह्यातील ९९- परतूर, १००- घनसावंगी, १०१- जालना, १०२- बदनापूर, १०३- भोकरदन या विधानसभा मतदार संघातील मतदार नसले तरीसुध्दा या मतदार संघात निवडणूक लढविणारे उमेदवार किंवा त्यांचे निवडणूक प्रतिनिधी यांना हे आदेश लागू होणार नाही. असेही आदेशात नमुद केले आहे.

# शेतीमाल वाहतुकीतून रेल्वेला एक कोटीचा महसूल

**पुणे । प्रतिनिधी**

**शेतकऱ्यांनी पिकवलेला शेतीमाल परराज्यात जाण्यासाठी मध्य रेल्वेने पुन्हा एकदा देवळाली ते दानापूर ही शेतकरी समृद्धी विशेष रेल्वे सुरू केली आहे. आतापर्यंत दिल्ली, चेन्नई व गुवाहाटी येथे ८,०१७ टन कांदा पुरवठा झाला आहे. शेतीमाल वाहतुकीतून पहिल्या तीन आठवड्यांत रेल्वेला एक कोटी महसूल मिळाला आहे.**


शेतकऱ्यांना कांद्यासारखा नाशवंत माल थेट रेल्वेने पाठविण्याची सुविधा देण्यासाठी भुसावळ विभागाने या रेल्वेत १० बोगी शेतीमालासाठी (प्रत्येकी २३ टन) आणि १० सामान्य डबे जोडण्यात आले आहेत. ही किसान समृद्धी एक्स्प्रेस १६ ऑक्टोबरपासून सुरू झाली असून, दर शनिवारी धावते. जबलपूर, सतना, प्रयागराज, आरा, बक्सर आणि दानापूर या शहरांत जाणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचा शेतीमाल वेळेवर पोहोचविण्यासाठी मोठी सोय झाली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना फायदा होणार आहे. डाळिंब, सीताफळ, द्राक्षे, कांदा, संत्री, लिंबू आदी परराज्यात जात आहे. त्यातून सुमारे १० लाख रुपयांचा महसूल रेल्वेला मिळत आहे. ही शेतकरी समृद्धी विशेष रेल्वे ३० नोव्हेंबरपर्यंत सुरू राहणार आहे. देशातील सर्वांत लहान शेतकऱ्यांना त्यांचा शेतीमाल देशाच्या दूर टोकाला पाठविण्याची सुविधा उपलब्ध झाली आहे.



देशभरातील कांद्याच्या वाढत्या किमतीमुळे मध्य रेल्वेच्या भुसावळ विभागाने नाशिक जिल्ह्यातील कसबे सुकेणे, लासलगाव स्थानकावरून दिल्लीतील किशनगंज, चेन्नईमधील कोरुक्कुपेठ आणि गुवाहाटीजवळील चांगसारी येथील प्रमुख ग्राहक केंद्रांमध्ये कांदा पाठविण्यास सुरुवात केली आहे. नाशिक जिल्ह्यातील फेडरेशन, नाफेड आणि एनसीसीएफ यांच्याशी समन्वय साधत शहरी केंद्रांपर्यंत जलद आणि मोठ्या प्रमाणात वितरण करून किमतीवर प्रभावीपणे बाजारभावावर अंकुश ठेवण्याचा प्रयत्न यामुळे शक्य झाला आहे. या उपक्रमामुळे सरकारच्या किमती नियंत्रणाच्या प्रयत्नांना केवळ पाठिंबाच मिळाला नाही तर भुसावळ विभागासाठी मालवाहतूक महसूलही मिळाला आहे.

# दूधदरातील तफावतीचे तीस रुपये जातात कोठे-सुप्रिया सुळे

**अहिल्यानगर : शेतकऱ्यांच्या दुधाला अठ्ठावीस रुपये दर मिळतो आणि ग्राहकाला साठ ते सत्तर रुपये दराने खरेदी करावे लागते. मधल्या तफावतीमधील तीस रुपये जातात कोठे, त्याला जबाबदार कोण? असा प्रश्न खासदार सुप्रिया सुळे यांनी उपस्थित केला. शेतकरी, सामान्याच्या जीवनात आनंद येण्यासाठी राज्यात परिवर्तन करण्याची गरज असल्याचे सुळे म्हणाल्या.**



अहिल्यानगर येथे महाविकास आघाडीचे उमेदवार अभिषेक कळमकर यांच्या प्रचारासाठी खासदार सुप्रिया सुळे यांची सभा झाली. माजी आमदार दादा कळकमर, शिवसेनेचे नेते विक्रम राठोड, जिल्हाध्यक्ष राजेंद्र फाळके, दिलीप सातपुते, संभाजी कदम, बाळासाहेब बोराटे, काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष किरण काळे, नीलेश मालपाणी आदी उपस्थित होते. सुप्रिया सुळे म्हणाल्या, विधानसभेत चांगले काम करणारे म्हणून देवेंद्र फडणवीस यांचा मला अभिमान वाटायचा. विरोधक दिलदार असला पाहिजे. ते पाच वर्ष मुख्यमंत्री होते. पण संगतीमुळे त्यांचा प्रॉब्लेम झाला आहे.

बदलापूर घटनेबाबत बंदूक दाखवून फोटो काढतात हे दुर्दैवी आहे. बंदूक दाखवणारा गृहमंत्री पाहिजे का, असे म्हणत सुळे म्हणाल्या, अडचण पोलिसांची नाही त्या मंत्रालयाची आहे. पूर्वीची भाजप चांगली होती. नितीन गडकरी चांगले व्यक्तिमत्त्व आहे. आम्ही चांगल्याला चांगलेच म्हणतो. गडकरी यांनी राज्यात चांगले काम केले आहे.

लोकसभेत लाडकी बहिण मीच होते. लोकसभेला बहिण लाडकी झाली आणि पंधराशे रुपये सुरु झाले. पण आमच्या बहिणींचे प्रेम कळले नाही. प्रत्येक गोष्टीत ते पैसे आणतात. त्यांनी नात्यात पैसे आणले. बहिणीला पंधराशे दिले आणि २२०० रुपये तेलाच्या डब्यातून काढून घेतले जात आहेत. महागाई आणि बेरोजगारीवर कोणी बोलत नाहीत.

महागाईला कोण जबाबदार आहे याचा विचार केला पाहिजे. अहिल्यानगर शहरासह जिल्ह्यात कोणाचीही मनमानी चालणार नाही. आमचा आमदार निवडून आल्यानंतर येथे रयतेचे राज्य आले आहे, मोकळा श्वास घेतोय असे लोक बोलले पाहिजेत. छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्यात परिवर्तन आणायचे आहे. कारण येथील आणि अनेक भागातील अस्वस्थता पाहता परिवर्तनाची गरज आहे. येथे कोणाला अडचण आली तर थेट मला संपर्क करा. उद्धव ठाकरे यांनी कोविडमध्ये चांगले काम केले आणि यांनी दोन हजाराला महाराष्ट्र विकला असा आरोप सुळे यांनी केला.

# मोसंबीचे कीड, रोग व्यवस्थापन

**निसर्गतः संत्रा/मोसंबी फळझाडास वर्षातून तीनदा बहार येतो. त्यापैकी पावसाळ्यात (जून-जुलै) येणाऱ्या बहारास ''मृग बहार (मृग नक्षत्रात येणारा) आणि पावसाळा संपल्यानंतर (ऑक्टोबरमध्ये) येणाऱ्या बहारास ''हस्त बहार (हस्त नक्षत्रात येणारा) तर थंडी संपतेवेळी (जानेवारी-फेब्रुवारी) म्हणजे आंब्याला ज्या वेळी बहार येतो तो ''आंबिया बहार असे तीन बहार वेगवेगळ्या ऋतूंमध्ये येतात. मोसंबीवर सातत्याने मावा, सिल्ला, पाने खाणारी अळी, ढेकूण, डिंक्या अशा रोगांमुळे शेतकरी अडचणीत येतात. फळगळ देखील सातत्याने होत असते. यामुळे आंतरमशागतीची कामे वेळेवर करून तणनियंत्रण करावे. किडींचा प्रादुर्भाव लक्षात घेता सापळे लावावेत, असा सल्ला कृषी अभ्यासक देतात.**

**किड आणि रोग व्यवस्थापन :**

मावा किडीच्या नियंत्रणासाठी डायमिथोएट २० मिलीलीटर दहा लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. तसंच पाने खाणाऱ्या अळीला रोखण्यासाठी क्विनॉलफॉस २० मिलीलीटर १० लिटर पाण्यात मिसळून फवारावे. ढेकूणच्या नियंत्रणासाठी क्लोरोपायरीफॉस २५ मिलीलीटर किंवा डायमेथोएट २० मिलीलीटर १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

**आंबिया बहार घेण्याकरिता खताचे नियोजन**

डिसेंबरच्या दुसऱ्या आठवड्यापासून ताणावर सोडल्यानंतर त्वरीत प्रत्येक झाडाला ४० ते ५० किलो शेणखत टाकून आडवी आणि उभी वखरण करावी. जानेवारीच्या शेवटच्या आठवड्यात किंवा तापमान वाढताच हलके ओलित करावे. ताण तोडतांना हलक्या ओलिताअगोदर प्रत्येक झाडाला ६०० ग्रॅम नत्र + ४०० ग्रॅम स्फुरद + ४०० पालाश आणि भरखते द्यावीत, त्यानंतर पाच ते सात दिवसांनी दुसरे पाणी (चिंबवणी) द्यावे. तिसऱ्या पाळीला भरपूर पाणी द्यावे. ताण सोडल्यावर २० ते २५ दिवसांनी फुले येतात.



त्यानंतर उरलेल्या नत्राचा (अर्धा) हप्ता एक ते दीड महिन्याने किंवा फळे वाटाण्याएवढी झाल्यावर द्यावा. हलक्या जमिनीत नत्राची मात्रा तीन ते चार हप्त्यात विभागून दिल्यास जास्त फायदेशीर ठरते.

**संत्रा/मोसंबीचे बहार :**

निसर्गतः संत्रा/मोसंबी फळझाडास वर्षातून तीनदा बहार येतो. त्यापैकी पावसाळ्यात (जून-जुलै) येणाऱ्या बहारास ''मृग बहार (मृग नक्षत्रात येणारा) आणि पावसाळा संपल्यानंतर (ऑक्टोबरमध्ये) येणाऱ्या बहारास ''हस्त बहार (हस्त नक्षत्रात येणारा) तर थंडी संपतेवेळी (जानेवारी-फेब्रुवारी) म्हणजे आंब्याला ज्या वेळी बहार येतो तो ''आंबिया बहार असे तीन बहार वेगवेगळ्या ऋतूंमध्ये येतात.

# उत्तम उत्पादनासाठी लसूण लागवडीचे तंत्र

**लसूण हे एक महत्त्वाचे मसाला पीक म्हणून गणले जाते. भारतात मध्य प्रदेश, गुजरात, ओडिशा आणि महाराष्ट्र या राज्यांमध्ये प्रामुख्याने लसूण लागवड केली जाते. महाराष्ट्रात सुमारे १२ हजार हेक्टर क्षेत्रावर लसूण लागवड असते. पुणे, नाशिक, धुळे, अहिल्यानगर, जळगाव, सातारा हे लसूण पिकविणारे प्रमुख जिल्हे आहेत. राज्यामध्ये लसूण लागवड मोठ्या प्रमाणावर होत असली, तरी लसणाचे सरासरी हेक्टरी उत्पादन फक्त ९ मे. टन इतकेच आहे. राजगुरुनगर येथील कांदा व लसूण संशोधन संचालनालयाने चांगल्या गुणवत्तेचे व अधिक उत्पादन देणाऱ्या दोन जाती विकसित केल्या आहेत.**



**भीमा ओमकार :** ही लसणाची जास्त उत्पादन देणारी चांगल्या प्रतीची जात नालंदा, बिहार या भागांतून गोळा केलेल्या लसणांमधून निवड पद्धतीने विकसित केली आहे. या जातीचे कंद मध्यम आकाराचे, घट्ट आणि पांढऱ्या रंगाचे असतात. एका कंदामध्ये १८ ते २० पांढऱ्या रंगाच्या पाकळ्या असून, एकूण विद्राव्य घन पदार्थांचे प्रमाण हे ४१.२ टक्के इतके असते. लागवडीपासून १२० ते १३५ दिवसांत पीक तयार होते. या जातीपासून १४ टन प्रति हेक्टरपर्यंत उत्पादन मिळू शकते. ही जात पानांवरील रोगांना प्रतिकारक्षम आहे.

**भीमा पर्पल :** लसणाची ही जात कांदा व लसूण संचालनालयाने एन्गुल, ओडिशा येथून गोळा करण्यात आलेल्या लसणातून निवड पद्धतीने विकसित केली आहे. हे वाण उत्तम प्रतीचे असून जास्त उत्पादन देणारे आहे. कंद मध्यम आकाराचे, घट्ट आणि पांढऱ्या रंगाचे असतात. एका गड्ड्यामध्ये १६ ते २० जांभळसर पांढऱ्या रंगाच्या पाकळ्या असून, एकूण विद्राव्य घन पदार्थांचे प्रमाण ३३.६ टक्के असते. लागवडीपासून १३५ ते १५० दिवसांमध्ये पीक तयार होते. या जातीपासून १७ टन प्रति हेक्टरपर्यंत उत्पादन मिळू शकते.

**हवामान :** लसूण हे थंडीला प्रतिसाद देणारे पीक आहे. वाढीच्या काळात थंड आणि किंचित दमट हवामान, तर गड्डा परिपक्व होत असताना काढणीच्या काळात कोरडे हवामान हवे असते. लागवडीनंतर सुरुवातीचे दोन महिने पानांची वाढ होते, तेव्हा रात्रीचे तापमान १० ते १५ अंश सेल्सिअस व दिवसाचे तापमान २५ ते २८ अंश सेल्सिअसच्या दरम्यान लागते. हवेतील सापेक्ष आर्द्रता ७० ते ८० टक्के व सूर्यप्रकाश ११ ते १२ तास सूर्यप्रकाश मिळाल्यास पाकळ्या चांगल्या पोसतात आणि गड्डा आकाराने वाढू लागतो.

म्हणूनच लसणाची लागवड ऑक्टोबर अखेर ते नोव्हेंबर महिन्याच्या सुरुवातीलाच (शक्यतो पहिल्या आठवड्यात) करावी. गड्ड्याची वाढ सुरू होण्यापूर्वी पानांची वाढ होऊन भरपूर संख्या असली पाहिजे, त्यामुळे अधिक उत्पादनाची हमी मिळते. नोव्हेंबर, डिसेंबर आणि जानेवारी या काळात रात्रीचे तापमान रोपांच्या वाढीस पोषक ठरते. फेब्रुवारी आणि मार्च या महिन्यांत रात्री तापमान कमीच राहते, परंतु दिवसाच्या तापमानात वाढ होते. हवेतील आर्द्रता कमी होते आणि गड्डा पोसू लागतो. एप्रिल महिन्यात तापमान आणखी वाढते. या काळात गड्डे काढणीस येतात. उशिरा लागवड झाली तर गड्ड्यांचा आकार छोटा राहतो, वजन कमी भरते आणि उत्पादन देखील कमी येते.

**जमीन :** या पिकाला जमीन भुसभुशीत आणि कसदार लागते. मध्यम काळ्या जमिनीत सेंद्रिय खतांचा पुरवठा चांगला केल्यास उत्पादन चांगले मिळते. भारी काळ्या किंवा चोपण जमिनीत गड्ड्याची वाढ चांगली होत नाही. पाण्याचा चांगला निचरा न होणाऱ्या जमिनी या पिकासाठी टाळाव्यात.

**लागवड :** उन्हाळ्यात खोल नांगरट करून नंतर २ ते ३ कुळवाच्या पाळ्या द्याव्यात. हरळी, लव्हाळ्याच्या गाठी किंवा पूर्वीच्या पिकाची धसकटे वेचून घ्यावी. हेक्टरी १० ते १५ टन शेणखत शेवटच्या कुळवणीद्वारे जमिनीत मिसळून द्यावे. सामान्यतः लागवड सपाट वाफ्यात केली जाते. त्यासाठी २ ४ किंवा ३ ४ मीटर अंतराचे वाफे करावेत. जमीन एकदम सपाट असेल तर १.५ ते २ मीटर रुंदीचे आणि १० ते १२ मीटर लांबीचे सारे तयार केले तरी चालतात.

**बीजप्रक्रिया :** लागवडीपूर्वी पाकळ्या कार्बेन्डाझिम आणि कार्बोसल्फानच्या द्रावणात दोन तास बुडवून ठेवून मगच लागवड करावी. त्यासाठी कार्बोसल्फान २० मि.लि. अधिक कार्बेन्डाझिम २५ ग्रॅम प्रति १० लिटर पाणी मिसळून द्रावण तयार करावे.

**आंतर मशागत व तणनाशकांचा वापर :**

लसूण लागवडीनंतर १२ ते १५ दिवसांत उगवण होते. वाफ्यात वरून व्यवस्थित न कुजलेले शेणखत घातलेले असल्यास त्यातील तणांचे बी उगवते. लागवडीनंतर पहिल्याच आठवड्यात वाफे गवताने भरलेले दिसतात. खुरपणी त्वरित न केल्यास पिकाचे बरेच नुकसान होते. गवताचे रोप बारीक असल्यामुळे खुरपणी लवकर उरकत नाही आणि मजुरीचा खर्च वाढतो. त्यामुळे शेतकरी तणनाशकाच्या वापराकडे वळत आहेत. लसणामध्ये तणाचे बी रुजून येण्यापूर्वी मारावयाचे तणनाशक वापरावे लागते. त्यासाठी पाकळ्यांची लागवड झाल्यानंतर कोरड्या वाफ्यात, पाटात आणि वरंब्यावर तणनाशक उदा. ऑक्सिफ्लुरोफेन १५ मि.लि. किंवा पेंडीमिथेलिन २५ मि.लि. प्रति १० लिटर पाणी या प्रमाणे फवारावे. या फवारणीनंतर लगेच पाणी द्यावे किंवा लागवड करून पाणी दिल्यानंतर दुसऱ्या दिवशी तणनाशक मारले तरी चालते.

**अन्नद्रव्य व्यवस्थापन :**

लसूण पिकाला १०० किलो नत्र, ५० किलो स्फुरद आणि ५० किलो पालाश द्यावे लागते. लागवडीपूर्वी ५० टक्के नत्र आणि संपूर्ण पालाश व स्फुरद जमिनीत मिसळून द्यावी. नत्राची राहिलेली मात्रा दोन हप्त्यांत विभागून द्यावी. पहिली मात्रा लागवडीनंतर ३० दिवसांनी, तर दुसरी मात्रा ४५ ते ५० दिवसांनी द्यावी. सुपर फॉस्फेट किंवा अमोनिअम सल्फेट या खतांचा वापर केल्यास आवश्यक तेवढ्या गंधकाची मात्रा पिकास मिळू शकते. अन्यथा, २५ किलो गंधक वेगळे देणे आवश्यक आहे.

**पाणी नियोजन :** या पिकास कमी पण नियमित पाणी आवश्यक आहे. पाकळ्या कोरड्यात लावल्यानंतर लगेच पाणी द्यावे. उगवण झाल्यानंतर ८ ते १० दिवसांच्या अंतराने जमिनीच्या मगदुराप्रमाणे पाण्याच्या पाळ्या द्याव्यात. साधारणपणे १२ ते १५ पाण्याच्या पाळ्या लागतात.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१४९३ : ख्रिस्तोफर कोलंबस यांनी पोर्तो रिको हे बेट पहिल्यांदा पाहीले.
१७३८ : फ्रांस व ऑस्ट्रिया या दोन देशांदरम्यान शांती करारावर स्वाक्षरी करण्यात आल्या होत्या.
१७७२ : पेशवा माधवराव प्रथम यांचे छोटे बंधू नारायणराव ह्याने पेशवा पदाची सुत्रे सांभाळली होती.
१८०९ : फ्रान्सच्या आरमाराने बंगालच्या उपसागरात ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीच्या आरमाराचा पराभव केला.
१८८२ : अण्णासाहेब किर्लोस्करांचे 'संगीत सौभद्र' हे नाटक रंगभूमीवर आले.
१९०५ : लॉर्ड कर्झन यांनी राजीनामा दिल्यामुळे लॉर्ड मिंटो यांनी भारताचे १७ वे व्हॉइसरॉय व गव्हर्नर जनरल म्हणुन सूत्रे हाती घेतली.
१९१८ : लाटव्हियाने आपण (रशियापासून) स्वतंत्र असल्याचे घोषित केले.
१९२८ : वॉल्ट डिस्ने यांच्या 'मिकीमाऊस' या प्रसिद्ध कार्टूनचा 'स्टीमबोट विली' या चित्रपटाद्वारे जन्म
१९३३ : 'प्रभात'चा पहिलाच रंगीत चित्रपट 'सैरंध्री' प्रदर्शित झाला. मात्र चित्रपटाला हवा तसा प्रतिसाद न मिळाल्याने 'प्रभात'ने पुन्हा रंगीत चित्रपट काढला नाही.
१९५५ : भाक्रा-नांगल धरणाच्या बांधकामास सुरूवात झाली.
१९५६ : मोरक्को या देशाने स्वतंत्रता प्राप्त केली होती.
१९६२ : डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या हस्ते शिवाजी विद्यापीठाचे उद्घाटन झाले.
१९६३ : पहल्या पुश-बटण टेलिफोनची सेवा चालू झाली.
१९७२ : वाघाची भारताचा राष्ट्रीय पशु म्हणून निवड करण्यात आली.
१९९२ : ललित मोहन शर्मा यांनी भारताचे २४ वे सरन्यायाधीश म्हणुन कार्यभार सांभाळला.
१९९३ : दक्षिण अफ्रिकेत २१ राजकीय पक्षांनी नवीन संविधानाला मान्यता दिली.
२००३ : आर्नोल्ड श्वार्णजेगर याची आजच्याच दिवशी कैलिफोर्निया या अमेरिकेतील प्रांताचा गवर्नर म्हणून निवड करण्यात आली होती.
२००५ : प्रधानमंत्री महेंद्र राजपक्षे यांची श्रीलंकेचे राष्ट्रपती म्हणून निवड करण्यात आली होती.
२०१३ : अमेरिकेची अंतराळ संस्था नासाने मंगळ ग्रहावर मावेन नामक यान पाठविले होते.
२०१५ : टेनिसपटू रॉजर फेडरर ने नोव्हाक जोकोविच ला पराभूत करून एटीपी वर्ल्ड टूर लंडन च्या उपांत्यफेरीत प्रवेश केला
२०१५ : भारतीय शटलर पी. व्ही. सिंधू ला काऊलुन येथे हाँगकाँग ओपन बॅटमिंटन स्पर्धेत स्पेनच्या कॅरोलिना मारीन हिने पहिल्याच फेरीत पराभूत केले.
२०१५ : भारतीय स्क्वॉश खेळाडू सौरव घोशाल चा बेलिबी येथे जागतिक स्क्वॉश स्पर्धेत ईंग्लंडच्या जेम्स विल्यस्ट्राप ने दुसऱ्या फेरीत पराभूत केले.
२०१७ : आजच्याच दिवशी भारताची मानुषी छील्लर हिने जागतिक सुंदरी हा पुरस्कार प्राप्त केला होता.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८९८ : प्रबोध चंद्र बागची - भारताचा अतिप्राचीन इतिहास.
१९१५ : टेनिस खेळातील सर्वोच्च पुरस्कार प्राप्त करणारी ग्रँड स्लाम जिंकणारी प्रथम दक्षिणा अमेरिका खंडातील महिला खेळाडू अनिता लीजना हिचा जन्म.
१९२२ : रशियन कवी युरी नोरोजोव यांचा जन्म झाला.
१९०१ : व्ही. शांताराम - चित्रपटनिर्माते, दिग्दर्शक आणि अभिनेते, पद्मश्री, दादासाहेब फाळके पुरस्कार विजेते (मृत्यू: १९९०)
१९०६ : मिनी कार चे निर्माते अ‍ॅलेक इझिगोनिस यांचा जन्म. (मृत्यू: २ ऑक्टोबर १९८८)
१९०९ : कॅपिटल रिकॉर्ड्स चे सहसंस्थापक जॉनी मर्सर यांचा जन्म. (मृत्यू: ६ ऑक्टोबर १९७६).
१९१० : बटुकेश्वर दत्त - क्रांतिकारक (मृत्यू: २० जुलै १९६५)
१९३१ : श्रीकांत वर्मा - हिन्दी कवी, पत्रकार व समीक्षक, राज्यसभा सदस्य (मृत्यू: १९८६)
१९४५ : महिंदा राजपक्षे - श्रीलंकेचे ६ वे राष्ट्रपती, सैन्यप्रमुख.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१७७२ : माधवराव बल्लाळ भट ऊर्फ 'थोरले' माधवराव पेशवे - मराठा साम्राज्यातील ४ था पेशवा (जन्म: १६ फेब्रुवारी १७४५)
१८३० : इल्युमिनॅटि चे संस्थापक अ‍ॅडम वाईशप्त यांचे निधन. (जन्म: १७४८)
१८३५ : इंग्लिश अधिकारी व इतिहासकार कर्नल टॉड यांचे निधन.
१८९३ : ब्रिटीश पुरातत्वशास्त्री कनिंघम यांचे निधन.
१९३६ : भारताचे वकील व राजकारणी व्ही. ओ. चिदंबरम पिल्लई यांचे निधन. (जन्म: ५ सप्टेंबर १८७२)
१९६२ : नील्स बोहर - अणूचे अंतरंग स्पष्ट करणार्या शोधासाठी नोबेल पारितोषिक मिळवणारे डॅनिश पदार्थवैज्ञानिक (जन्म: ७ आक्टोबर १८८५)
१९७८ : प्रसिध्द बंगाली निर्देशक व अभिनेते धीरेंद्र गांगुली यांचे निधन.
१९९३ : पु. रा. भिडे तथा स्वामी विज्ञानानंद - लोणावळा येथील मन:शक्ती प्रयोग केंद्राचे संस्थापक.
१९९६ : कॉम्रेड श्रीनिवास गणेश सरदेसाई - समाजवादी विचारवंत, स्वातंत्र्यसैनिक, भारतातील कम्युनिस्ट चळवळीचे आरंभापासूनचे नेते.
१९९८ : रामकृष्ण नारायण तथा बन्याबापू गोडबोले - साताऱ्याच्या सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, धार्मिक, आर्थिक, शैक्षणिक, वैद्यकीय अशा सर्वच क्षेत्रात भरीव कामगिरी करणारे समाजसेवक.
१९९९ : रामसिंह रतनसिंह परदेशी - स्वातंत्र्यसैनिक, 'कॅपिटॉल बॉम्ब स्फोट' कटातील एक आरोपी.
२००१ : नारायण देवराव पांढरीपांडे तथा 'नाडेप काका' - गांधीवादी विचारवंत व 'नाडेप' कंपोस्ट खताचे जनक. गायीच्या शेणापासून कंपोस्ट खत तयार करुन त्यांनी रासायनिक खतांना पर्याय दिला. त्यांची पद्धत भारतातील अनेक कृषी विद्यापीठांनी स्वीकारली. (जन्म: खांडवा, मध्य प्रदेश).
२००६ : 'काव्यतीर्थ' हणमंत नरहर जोशी तथा कवी सुधांशु - मराठी कथाकार व कवी (जन्म: ६ एप्रिल १९१७)
२०१३ : भारतीय संगीतकार एस. आर. डी. वैद्यनाथन यांचे निधन. (जन्म: १५ मार्च १९२९)
२०१४ : भारतीय दिग्दर्शक आणि निर्माते सी. रुधराय्या यांचे निधन.
२०१७ : अशोकचक्र सन्मानित भारतीय वायुसेनेचे गरुड कमांडो शहीद ज्योतीप्रकाश निराला यांचे निधन झाले होते.

cmyk



# नगरपालिका कोणी खाल्ली; सर्वांना माहित आहे -अर्जुन खोतकर

जालना । प्रतिनिधी

जालना मतदार संघातील पारेगांव, पारेगांव तांडा, पारेगांव वाडी, देवमूर्ती, वृदावन गौ शाला येथे महायुतीचे (शिवसेना) अधिकृत उमेदवार श्री. अर्जुनराव खोतकर यानीं भेटी दिल्या. त्यावेळी फटाके फोडून आणि बॅण्ड वाजवून त्यांचे जंगी स्वागत करण्यात आले.

यावेळी झालेल्या कॉनेर बैठकांमध्ये बोलतांना श्री. खोतकर म्हणाले की, राज्यातील महायुतीच्या सरकारने गेल्या अडीच वर्षात अनेक लोकहीताचे निर्णय घेतल्याचे त्यांनी या प्रचार दौ-यानिमित्त सांगितले. त्यामध्ये मुख्यत: शेतकर्यांना मोफत वीज, एक रुपयामध्ये पिक विमा, पिकविमा व अतिवृष्टी चे अनुदान, शेतकर्यांना मागेल त्याला सौर पंप, महिलांना लाडकी बहीण योजना मासिक १५०० रूपये, महिलांना बसमध्ये ५० टक्के सवलत, मुलींना मोफत शिक्षण, युवकांना रोजगार, वृध्दांना मोफत बस, वयोश्री व तिर्थक्षेत्र योजना यासारख्या अनेक कल्याणकारी योजना सुरू करून त्या प्रत्यक्षात अंमलात आणल्या. या योजनांचा सर्व समाजातील गोरगरीब व कष्टकरी वर्गाला न्याय मिळाल्याचे सांगितले. यापुढे ही महायुतीचे सरकार राज्यात आल्यास केंद्र सरकारकडून या योजना चालू ठेवण्यासाठी व विकास कामांसाठी मोठा निधी मिळेल अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. त्यामुळे जालना विधानसभा मतदारसंघातील मतदारांनी विरोधकांच्या भूलथापांना बळी न पडता येणार्या वीस तारखेला धनुष्यबाण या चिन्हासमोरील बटन दाबून मला प्रचंड मतांनी विजयी करावे, असे सांगून ते म्हणाले की, तुमचे कुठलेही काम करण्यास मी सज्ज आहे. सत्तेवर असो वा नसो तरीही मी मोठ्याप्रमाणात निधी आणून कामे केली आहेत. आज जे कुणी माझ्या नावाने बोटे मोडीत असतील परंतू सत्य हे लपून राहत नाही. नगर पालिका कोणी खाल्ली, हे सर्वांना माहितच आहेत. शहराला थेट जायकवाडीतून पाणी कोणी आणले, मेडीकल कॉलेज कुणी आणले, हेही जनतेला माहित आहे, असे असतांनाही तो भामटा म्हणतो की, माझ्यामुळेच हे सर्व आले आहे, असे सांगून ते म्हणाले की, विरोधकांना केवळ आपल्यावर टिका केल्याचे समाधान वाटत असेल तर वाटू द्या, त्यांना आपले नांव घेतल्याशिवाय त्यांचा दिवस जात नाही, याचाच अर्थ मतदारराजा हा आपल्या बाजूने उभा आहे, त्यांचा आशिर्वाद हा धनुष्यबाणालाच मिळणार आहे. विद्यमान आमदाराने सत्तेवर असूनही



कोणतीही कामे केली नाहीत. उलट आपण आणलेल्या कामांवर दावा केला जात आहे. मात्र वस्तुस्थिती लपून राहत नाही. आपण सत्तेवर नसतांनाही जालन्याचा पाणी प्रश्न मिटवला. मेडीकल कॉलेज जालन्याला आणले. परंतू विरोधी आमदार मात्र मी हे केले, ते केले, असे सांगत सुटले आहेत, हे त्यांना शोभेणारे नसले तरी आपले नांव घेतल्याशिवाय आणि आपल्यावर टिका केल्याशिवाय त्यांचा दिवस जात नाही, असे सांगून श्री. खोतकर म्हणाले की, महानगर पालिकेचा संपूर्णपणे बट्ट्याबोळ केला आहे. आपण सत्तेवर आलो तर संपूर्ण कारभार सुधाण्यात येईल. पाणी सुध्दा आपण आणले मात्र हा भामटा स्वत:ला जलसम्राट म्हणून घेत आहे, असे सांगून ते म्हणाले की, राज्यातले रस्ते, आरोग्य सेवा, परिवहन सेवा, पाणी व्यवस्था, शिक्षण व्यवस्था, शेतकर्यांचे शेती विषयक योजना, वयोवृध्द मंडळींना वयोश्री योजना, महिला साठी दरमहा पंधरा रुपये या सर्व योजना महायुती सरकारने राबविल्या आहेत. आपले कोणतेही काम असू द्यात ते मार्गी लावण्याचा पूर्णपणे प्रयत्न केला जाईल, असे आश्वासनही शेवटी श्री. खोतकर यांनी दिले.

**गो मातेला राज्यमातेचा दर्जा नाही, गो शाळांना अनुदान नाही, एकनाथराव शिंदे सरकारने केवळ राज्यमातेचा दर्जाच नाही तर प्रत्येक गायीला आणि वासरालाही अनुदान जाहीर केले. मात्र सरकारच्या प्रयत्नांमुळेच गायीच्या सुरक्षेबाबत प्रचार होत आहे. काही समाज विधातक प्रवृत्तींमुळे गायी कत्तलखान्यांकडे जात असून त्यांना कडक शासन व्हायला पाहिजे, गोहत्या बंदीचा कायदा असला तरी त्याची कडक अंमलबजाणी व्हायला पाहिजे. असे जर होत नसेल तर तुम्ही रस्त्यावर उतरा, आम्ही तुमच्या सोबत आहोत, अशी ग्वाही श्री. खोतकर यांनी दिली.**

# परांडा विधानसभा मतदारसंघात मतदारासह कर्मचाऱ्यांनाही ठेवाव्या लागणार २०० मीटर चपला बाहेर

## उमेदवार कांबळे यांच्या निशाणीने केला हा घोटाळा

बीड । प्रतिनिधी

निवडणुकांमध्ये जशा काही तणावाच्या घटना असतात. तशा गमतीशीरही काही घटना असतात. तशीच ही गमतीशीर घटना आहे. परंडा विधानसभा मतदारसंघातील गुरुदास संभाजी कांबळे या उमेदवाराने स्वत:च आचारसंहितेचा भंग होऊ नये म्हणून मी २०० मीटर चपला बाहेर ठेवीन आणि इतरांनाही त्याचे पालन करण्यास भाग पाडावे अशी विनंती निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांना केल्याने आता मतदारासह कर्मचाऱ्यांनाही २०० मीटर आपल्या चपला बाहेर ठेवाव्या लागणार आहेत. या पत्राने सर्वांचीच मोठी अडचण झाली आहे.



परंडा विधानसभा मतदारसंघांमध्ये आरण गावचे गुरुदास संभाजी कांबळे हे निवडणूक लढवत आहेत. त्यांची निशाणी चप्पल असल्याने त्यांनी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांना पत्र देऊन मतदान बूथ पासून २०० मीटरच्या आत कोणत्याही उमेदवाराचे चिन्ह प्रकाशित किंवा प्रदर्शित करण्यात सक्त मनाई असल्याने आदर्श आचारसंहितेचा भंग होऊ शकतो . आचारसंहितेचा कुठल्याही प्रकारचा भंग होऊ नये म्हणून मी माझी निशाणी चप्पल ही मतदान केंद्रापासून पासून २०० मीटरच्या अंतरावर ठेवणार आहे. याची मी पूर्णपणे काळजी घेणार असून मतदानाच्या दिवशी मतदान केंद्रावर २०० मीटर अंतरापर्यंत कोणतेही कर्मचारी, पदाधिकारी उमेदवार व मतदारांनी २०० मीटरच्या आत चप्पल घालून प्रवेश केल्यास त्यांच्यावर कडक कारवाई करण्यात यावी. कारण चप्पल ही माझी निशाणी असल्याने ती पायात घातल्याने माझा प्रचार व प्रसार लोकांनी पायात घालून प्रवेश केल्याने होऊ शकतो व आचारसंहितेचा भंग होणार यात शंका नाही. मतदारांनी २०० मीटर अंतराच्या बाहेर आपल्या चपला ठेवाव्यात याची याचे पालन केले नाही तर आचारसहिता भंगाचा गुन्हा दाखल करावा. असे पत्र स्वत:च गुरुदास कांबळे यांनी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांना दिले आहे .या पत्रामुळे मोठा घोळ झाला असून इतर उमेदवार तसेच शासकीय अधिकारी, प्रतिनिधी, आणि केंद्रावरील कर्मचारी कर्मचारी यांना कोणालाच चप्पल घालून मतदान केंद्रामध्ये मध्ये जाता येणार नाही. म्हणजे मतदान केंद्राला मंदिराचे स्वरूप येणार आहे. उद्या पावसाळा असला तरी एखाद्या उमेदवाराचे चिन्ह छत्री असेल तर छत्रीलाही उमेदवार मज्जाव करू शकतो. असे चित्र भविष्यात दिसले तर आश्चर्य वाटायला नको.

# बीड नगर परिषदेची अकार्यक्षमता पोलीस प्रशासनासाठी ठरतेयं डोकेदुखी!

बीड । प्रतिनिधी

शहरातील जुने एस.पी. ऑफिस कार्यालयाच्या मुख्य प्रवेशद्वारासमोर पोलीस प्रशासनाकडून लावण्यात आलेले सूचनाफलक पाहून बीड नगर परिषद ची उदासीनता, अनास्था, अकार्यक्षमता जशी नजरेत भरत आहे, तशीच ही बाब पोलीस प्रशासनासाठी डोकेदुखी ठरत असल्याचे ही दिसून येत आहे. मात्र यामुळे वाटसरू नागरिकांची काळजी कोण घेणार? असा प्रश्न मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकातून उपस्थित केला आहे.




## वाटसरू नागरिकांची कोण घेणार काळजी? - एस.एम.युसूफ़

याविषयी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे की, बीड नगर परिषदेची उदासीनता, अनास्था आणि अकार्यक्षमतेमुळे बीड शहराच्या विस्तारानुसार आवश्यक असलेल्या मुतारी व संडास जागोजागी निर्माण करणे गरजेचे असताना या महत्त्वाच्या व निकडीच्या बाबीकडे मात्र लक्ष देण्यात येत नाही. याकडे बीड नगर परिषद प्रशासनाचे अक्षम्य असे दुर्लक्ष आहे. यामुळे बशीरगंज चौक ते जिल्हा रुग्णालय या रस्त्यावर असलेल्या जुने एस.पी. ऑफिस येथे जिल्हा रुग्णालयात ये-जा करणारे रुग्ण व त्यांचे नातेवाईक निकडीच्या वेळी जुने एस.पी. ऑफिस च्या आवारात लघु शंका करीत होते. यामुळे या ठिकाणी असलेल्या पोलीस अधिकाऱ्यांच्या बिंदुसरा निवासस्थानी ये-जा करताना पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांना मुतारीचा उग्रवास येत होता. तसेच गलिच्छता स्पष्ट दिसत होती. यामुळे वैतागून पोलीस अधिकाऱ्यांनी या जागी असलेल्या मुख्य प्रवेशद्वाराच्या समोर मोठे सूचनाफलक लावले तसेच या मुतारीचा जाम वैताग आल्याने फक्त एका सूचना फलकावर समाधान न मानता चक्क मुख्य प्रवेशद्वारा बाहेर एक, मध्ये एक आणि अजून थोड्या अंतरावर एक असे तीन-तीन सूचना फलक लावले. त्यावर येथे लघवी केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल अशी तीन-तीन सूचना फलके आणि लांबलचक बॅरिकेट्स लावण्याची वेळ पोलीस प्रशासनावर का आली? तर याचे उत्तर आहे, बीड नगर परिषदेची उदासीनता, अनास्था आणि अकार्यक्षमता. बीड नगर परिषदेने आवश्यक संख्येत बीड शहरात जागोजागी मुतारी आणि संडास बांधले असते तर अशा प्रकारे तीन-तीन सूचनाफलक आणि बॅरिकेट्स लावण्याची वेळ पोलीस प्रशासनावर आली नसती. निगरगट्ट झालेल्या बीड नगर परिषदेने आता निदान पोलीस प्रशासनाच्या या कारवाईनंतर तरी आपल्या कार्यकर्तव्यात सुधारणा करावी. बीड शहरात आवश्यक तेथे मुतारी व संडासचे निर्माण करावे. जेणेकरून रस्त्यावरून ये-जा करणाऱ्यांना निकडीच्या वेळी त्याचा वापर करता येईल. असे मतही मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकातून व्यक्त केले आहे.

# डॉ.राजेश इंगोले यांच्या खुमासदार भाषणांनी महाविकास आघाडीचे उमेदवार पृथ्वीराज साठे यांच्या प्रचारसभांची रंगत वाढली

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

महाराष्ट्रात विधानसभेची निवडणूक आता अंतिम टप्प्यात आली आहे. सर्व उमेदवार आपापल्याला परीने प्रचार करीत आहेत. निवडणुकीत आपल्या विजयासाठी प्रयत्न करीत आहेत. केज विधानसभेत महाविकास आघाडी तर्फे राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरदचंद्र पवार गटातर्फे माजी आमदार पृथ्वीराज साठे हे ''तुतारी'' फुंकणारा माणूस या चिन्हासह केज निवडणुकीच्या रणांगणात उभे आहेत. यावेळी डॉ.राजेश इंगोले यांच्या खुमासदार भाषणांनी महाविकास आघाडीचे उमेदवार पृथ्वीराज साठे यांच्या प्रचारसभांची रंगत वाढवली आहे. शनिवारी अंबाजोगाईत आयोजित रोहितदादा पवार यांच्या सभेतील डॉ.राजेश इंगोले यांच्या नोट भी देंगे और वोट भी देंगे ही टॅग लाईन विशेष गाजली.



अंबाजोगाईच्या राजकारणाची दिशा ठरविणारे अंबानगरीचे माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी यांनी नुकताच कार्यकर्त्यांचा संवाद मेळावा घेत महाविकास आघाडीचे उमेदवार पृथ्वीराज साठे यांना पाठींबा दिला. याच कार्यक्रमात मोदी यांचे अत्यंत विश्वासू असलेले त्यांचे सहकारी सुप्रसिद्ध मानसोपचार व व्यसनमुक्ती तज्ज्ञ, माजी शिक्षण सभापती डॉ.राजेश इंगोले यांनी या कार्यकर्ता मेळाव्यात केलेले भाषण प्रचंड गाजले. मुद्देसूद मांडणी, अभ्यासपूर्ण रचना आणि जोडीला खुमासदार शेरोशायरी, कविता यामुळे डॉ.इंगोले यांचे भाषण म्हणजे रसिक, श्रोत्यांना पर्वणीच असते. डॉ.राजेश इंगोले यांनी मोदी यांनी दिलेल्या पाठींब्यानंतर प्रचारात सक्रिय सहभाग घेत अंबाजोगाई, केज, नेकनूर परिसरात अनेक ठिकाणी महाविकास आघाडीचे उमेदवार पृथ्वीराज साठे यांच्यासाठी कॉर्नर मिटिंग्स, बैठका घेत साठे यांना प्रचारात आघाडी घेऊन दिली आहे. डॉ.इंगोले यांनी याआधी विधानसभेची एक निवडणूक लढविल्यामुळे त्यांना मानणारा एक वर्ग या मतदारसंघात आहे. त्यांनी त्यांचा हा मित्र, परिवार या निवडणुकीत पृथ्वीराज साठे यांच्या मदतीसाठी भक्कमपणे उभा केला आहे. त्यामुळे ही मदतीची अधिक कुमक साठे यांना या निवडणुकीत मिळाली आहे. डॉ.इंगोले गेल्या अनेक वर्षांपासून डॉक्टर्सच्या विविध प्रश्नांवर अभ्यास करून त्यावर लढा देतात, डॉक्टर्सच्या अनेक प्रलंबीत प्रश्न तसेच वैद्यकीय सेवेत कुण्या डॉक्टरला काही अडचण आल्यास धावून जातात त्यामुळे अंबाजोगाई, केज, नेकनूर परिसरात त्यांना मानणारा डॉक्टर वर्ग तसेच व्यसनमुक्तीच्या क्षेत्रात केलेल्या कार्यामुळे त्यांचा सर्वदूर पसरलेला रूग्णवर्ग त्यांच्या शब्दाला मान देऊन साठे यांना निश्चित मदत करणार आहे. डॉ.राजेश इंगोले यांच्या अनोख्या आकर्षक वक्तृत्व शैलीमुळे त्यांच्या भाषणातून जनमत वळविण्याचे सामर्थ्य आहे, तळ्यात मळ्यात असणारा मतदार डॉ.इंगोले यांच्या भाषणानंतर राष्ट्रवादी काँग्रेसच्या पृथ्वीराज साठे यांना मदत करण्याच्या सकारात्मक मानसिकतेत येत आहे. त्यामुळे अंबाजोगाई, केज व नेकनूर परिसरात डॉ.राजेश इंगोले यांना आमच्या इथे कॉर्नर मीटिंग्स आणि बैठकांना पाठवा असा आग्रह कार्यकर्ते करीत आहेत. एकंदर मानसोपचार तज्ज्ञ असलेले डॉ.इंगोले हे लोकांच्या मनाचा ठाव घेण्यात व त्यांचे मत परिवर्तन करण्यात यशस्वी होत आहेत. अंबाजोगाई येथील शनिवारी झालेल्या रोहितदादा पवार यांच्या सभेत डॉ.राजेश इंगोले यांनी महाविकास आघाडीचे उमेदवार पृथ्वीराज साठे यांना निवडणुकीसाठी पन्नास हजार रूपयांची मदत करीत समोरील जनसमुदायापुढे नोट भी देंगे और वोट भी देंगे ही घोषणा केल्यावर उपस्थित जनसमुदयाने त्यांचे विशेष कौतुक करत टाळ्यांच्या कडकडाटात उत्स्फूर्त दाद दिली. त्यामुळे डॉ.राजेश इंगोले यांच्या खुमासदार भाषणांनी महाविकास आघाडीचे उमेदवार पृथ्वीराज साठे यांच्या प्रचारसभांची रंगत वाढविली आहे असे सर्वसामान्य कार्यकर्तेच आता बोलून दाखवत आहेत. मुद्देसूद मांडणी, अभ्यासपूर्ण रचना आणि जोडीला खुमासदार शेरोशायरी, कविता यामुळे डॉ.राजेश इंगोले यांचे भाषण म्हणजे रसिक, श्रोत्यांना पर्वणीच आहे.

# बीड शहर पोलिसांनी ४८ तासात केला खुनाचा उलगडा

## मुख्य आरोपीला पुण्यावरून अटक करून केली मोठी कामगिरी

**बीड । प्रतिनिधी**

दोन दिवसांपूर्वी मध्यरात्री मोंढा रोडने नदीच्या कडेला तांदळवाडी हवेली येथील युवकाचा दगडाने ठेचून खून झाला होता. सुरुवातीला मयताची ओळख सुद्धा पटत नव्हती परंतु बीड शहर पोलिसांनी अतिशय बारकाईने तपास करून यातील मयताची ओळख तर पटवली परंतु यातील सर्व चारही मारेकऱ्यांना ४८ तासाच्या आत अटक केली आहे. यातील मुख्य दोन आरोपी हे खुनानंतर पुणे येथे फरार झाले होते परंतु माहिती बातमीदाराच्या पक्क्या माहितीच्या आधारे यातील राहिलेले दोनही आरोपी पुणे येथून अटक करण्यास बीड शहर पोलिसांना यश आले आहे.



आता ही दोन आरोपी अटक झाल्यानंतर खून कसा आणि का करण्यात आला याची संपूर्ण माहिती समोर आली आहे. ज्या ठिकाणी खून झाला ते ठिकाण ही निर्जन ठिकाण असून त्या ठिकाणी यातील महिला आरोपी अनिता नरसिंह आदमाने रा माळीवेस बीड तिने तात्पुरते राहण्याची निवास व्यवस्था केली आहे. त्या महिलेकडे यातील मयत हा तिचा प्रियकर असून त्या महिलेकडे त्याची सतत जाणे येणे असायचे. परंतु तिच्याकडे इतर कोणी आलेले त्याला आवडायचे नाही. पुणे इथून अटक केलेले आरोपी रामु बंडू चित्रे राहणार यादवाचा मळा माळीवेस आणि गणेश वसंत माने राहणार माळीवेस चौक हे दोघे यांचे तेथे येणे जाणे वाढले होते. याचा राग सतत यातील मयत सय्यद मजर सय्यद अख्तर रा तांदळवाडी हा

घटनेच्या दिवशी रामू आणि गणेश हे दोघेजण तेथे दारू पीत बसले होते खरे म्हणजे रामूच्या मागावर पेठ बीडची पोलीस होती आणि एका गुन्ह्यात तो हवा होता म्हणून तो तिथे लपून बसायला आला होता. परंतु यातील मयात रात्री बारा वाजता च्या सुमारास तेथे येऊन रामू आणि गणेशला काठीने मारहाण करू लागला. तो एकच म्हणत असे की येथे तुम्ही माझ्या प्रेयसी जवळ का बसतात. त्यामुळे तिथून ते निघून जाऊ लागले तर नदीच्या कडेने जात असता याने परत पाठीमागून रामूला आणि गणेशला दगड मारायला सुरुवात केली. तो ऐकत नाही हे पाहून रामू आणि गणेश यांनी दोघांनी व सदर महिलाही मारायला सोबत होती त्याला दगडाने ठेचून आणि काठीचे घाव डोक्यात घालून जागीच ठार केले आणि पुन्हा त्या बाईजवळ जाऊन बसले. परंतु बाई अनिता तिने गणेशला आणि रामुला सांगितले की तो जर वाचला तर तुम्हाला तो सोडणार नाही त्यामुळे या दोघांनी पुन्हा तिथे जाऊन त्याच्या डोक्यावर दगडे टकले व त्यातच त्याचा मृत्यू झाला.

दुसऱ्या दिवशी सकाळी लवकरच यातील सर्व आरोपी चार ठिकाणी जाऊन बसले काहीच माहिती नाही हा बनाव केला परंतु पोलिसांनी सर्व खुनाची माहिती समोर आणली आणि सर्व आरोपीला ४८ तासाच्या आत अटक केली. पुणे येथून रामू आणि बंडू याला अटक करण्यासाठी डीबी पथकाने खास मेहनत घेतली आणि माहिती गारांच्या मदत घेऊन पाठलाग करून त्यांना पुणे येथे एका ठिकाणी जाळ्यात येतात त्यांना अटक केली. त्यांना सीतापतीने अटक केल्यावर त्यांनी वरील प्रमाणे घटनेचा उलगडा केला आहे. सदरील कारवाई, पोलीस अधीक्षक श्री. अविनाश बारगळ, अपर पोलीस अधीक्षक बीड श्री. सचिन पांडकर, उपविभागीय पोलिस अधिकारी श्री. विश्वांबर गोल्डे, बीड, यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक शितलकुमार बल्लाळ, बाबा राठोड -ळि , उमेश निकम ीळि,रियाज शेख ीळि,पोलीस अंमलदार सुशेन पवार विकी सुरवसे आयटीसीएल पोलीस नाईक जयसिंग वायकर, अश्फाक सय्यद व मनोज परजने, यांनी केली आहे.

# केज तालुक्यातील ऊस वाहतूक वाहनांना रेडियम, रिफ्लेक्टर लावा -दिनकर जाधव

## वाहतूक विभागाकडून जागृती आणि कार्यवाहीची आवश्यकता

**सारणी । प्रतिनिधी**

केज तालुक्यात दोन साखर कारखाने आहेत. दोन्ही कारखाने सुरु झाले आहे, ऊस उत्पादक शेतकर्यांसाठी आनंदाची गोष्ट आहे. पण रात्रीच्या वेळी ऊस वाहतूक करणार्या बहुतांश वाहनांच्यापाठीमागे रेडियम अथवा रिफ्लेक्टर लावलेले दिसून येत नाही. त्यामुळे अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यासाठी कारखाना संचालक यांनी याची सक्ती करुन होणारे अपघात टाळण्याची मागणी पत्रकार दिनकर जाधव यांनी पत्रकाद्वारे केली आहे.



दिवसेंदिवस रोडवरील अपघातांची संख्या वाढत आहे. वाढती अपघाताची संख्या कमी करण्यासाठी वाहतूक नियमांची जनजागृती तसेच त्यावर विविध उपाययोजना होणे गरजेचे आहे. सद्या साखर कारखाने सुरु झाले आहेत. रात्रीच्या वेळी ऊस वाहतूक करणार्या वाहनांमुळे अनेक अपघात झालेली आहेत. या अपघातामध्ये अनेक निष्पाप बळी गेलेले आहेत. त्यामुळे साखर कारखानदार यांनी कारखान्यावर येणाऱ्या प्रत्येक ऊस वाहतूक वाहनांच्या मागे रेडियम, रिफ्लेक्टर लावणे सक्तीचे करावे. तसेच वाहतूक विभागाकडून वाहतूक नियमांचे पालन न करणार्या ऊस वाहतूक वाहनांवर कडक कार्यवाही होणे गरजेचे आहे. तसेच ऊस वाहतूक करणार्या वाहन चालकाने वाहतूकीच्या नियमाचे काटेकोटरपणे पालन करुन वाहनांना रेडियम, रिफ्लेक्टर लावण्याबाबत वाहन चालक व मालक यांना सुचना देण्यात याव्यात अशी मागणी पत्रकार दिनकर जाधव यांनी पत्रकाद्वारे केली आहे.

# पुढील दहा वर्षांत राज्यात २५ हजार मेगावॅट वीज निर्मितीचे लक्ष्य- संजय मारूडकर

**परळी । प्रतिनिधी**

पुढील दहा वर्षात महाराष्ट्रामध्ये २५ हजार मेगावॅट वीज निर्मिती उत्पादन करण्याचे लक्ष्य महाजनकोने ठरविले असून परळी औष्णिक वीज निर्मिती केंद्राने सतत उत्कृष्ट कामगिरी केली आहे. भविष्यातही हे केंद्र विज निर्मिती उत्पादनात राज्यात अग्रेसर राहील असे प्रतिपादन महाजनकोचे कार्यकारी संचालक (संचलन) संजय मारूडकर यांनी केले. ते परळी येथील परळी औष्णिक विद्युत केंद्राच्या ५३ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलत होते.

शक्तीकुंज वसाहतीच्या मैदानावर संपन्न झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी परळी औष्णिक विद्युत केंद्राचे मुख्य अभियंता सुनिल इंगळे हे होते. तर या कार्यक्रमाचे उद्घाटन मुंबई येथील महाजनकोचे कार्यकारी संचालक (संचलन) संजय मारूडकर यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून प्रभारी कार्यकारी संचालक पी.एम.नागदेवते हे उपस्थित होते. यावेळी पुढे बोलताना संजय मरोडकर म्हणाले की, पूर्वीच्या आणि आताच्या कामात खूप फरक निर्माण झाला आहे. आता कामाची गती प्रचंड वाढलेली आहे. महानिर्मितीवर सुमारे पंचवीस हजार कोटी रुपयांचे कर्ज आहे. त्यातून आपण बाहेर येण्याची गरज आहे. महा निर्मितीमधील अधिकारी, कर्मचारी व अभियंता यांच्या अथक प्रयत्नामुळे मागील वर्षी सुमारे ५० कोटी रुपयांचा नफा झाल्याचे ते म्हणाले. यावर्षी हा नफा ५०० कोटी रुपयांच्या घरात गेला पाहिजे असे आवाहन त्यांनी केले.




यावेळी महाजनकोचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक डॉ अनबलगन (भा प्र से)यांनी आपला शुभ संदेश पाठविला. या संदेशात त्यांनी निर्मिती केंद्राच्या सर्व अभियंता, कर्मचारी, अधिकारी यांचे अभिनंदन केले तसेच संच क्रमांक सहाने सतत १०९ दिवस विक्रमी वीज निर्मिती

## परळी औष्णिक विद्युत केंद्राच्या ५३ वा वर्धापन

केल्याबद्दल कौतुक केले. भुसावळचे मुख्य अभियंता प्रफुल्ल भदाणे, उरणचे मुख्य अभियंता मोहन आव्हाड, मुंबईचे मुख्य अभियंता डॉ अनिल काठोये यांच्यासह अनेकांनी शुभेच्छा संदेश पाठवले आहेत.कार्यक्रमाचे प्रास्ताविक उप मुख्य अभियंता महेश महाजन यांनी केले. या वेळी मंचावर प्रभारी उपमुख्य अभियंता एच के अवचार,अधीक्षक अभियंता प्रसन्नकुमार गरुड, एस एम बुकतारे,धनंजय कोकाटे, राजीव रेड्डी, प्रभारी अधीक्षक अभियंता एस ए संनके, श्री सरोजज्ञ, सचिव बंडू राठोड, कृष्णा चाटे, महिला सचिव सेवा माटे मॅडम,डॉ ज्योत्स्ना रांदाड यांच्यासह आदी मान्यवर उपस्थित होते.दरम्यान यावेळी वर्धापन दिनानिमित्त घेण्यात आलेल्या सांस्कृतिक, क्रीडा, आनंद मेळावा, मनोरंजनात्मक क्रिकेट सामना विविध कार्यक्रम पार पडले. याप्रसंगी कु. अनन्या श्रीकांत इंगळे इयत्ता सहावी हिने नृत्यात प्रथम क्रमांक मिळवल्या बद्दल मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संदीप पाटील ,महेश मुंडे आणि के एच गीते मॅडम यांनी केले तर आभार प्रदर्शन सहाय्यक कल्याण अधिकारी शरद राठोड यांनी केले.

cmyk

cmyk

राज्य लोकतंत्र

महासंग्राम

शिवसेना

सोमवार, दि.१८ नोव्हेंबर २०२४

६

# जनता टक्केवारी घेणाऱ्या आमदाराला घरी बसवेल-डॉ.योगेश क्षीरसागर

## बाबा चौक, इस्लामपुरा, भालदारपुरा या भागात उमेदवार डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या प्रचारार्थ कॉर्नर बैठका

बीड । प्रतिनिधी

अल्पसंख्याक समाजाच्या विकासकामात बीडचे आमदार आडवे आले. त्यांना प्रत्येक कामात टक्केवारी पाहिजे होती. त्यामुळे विकासकामे रखडली. मात्र आता त्यांना घरी बसविण्याची वेळ आली आहे. विरोधकांकडे विकासाचे मुद्दे नसल्याने आमच्या विरोधात चुकीच्या व खोट्या पोस्ट सोशल मीडियातून व्हायरल केल्या जात आहेत. मात्र बीडची जनता त्यांना त्यांची जागा दाखविल्याशिवाय राहणार नाही, असा इशारा उमेदवार डॉ.योगेश क्षीरसागर यांनी दिली.

शहरातील बाबा चौक, इस्लामपुरा, भालदार पुरा या भागात उमेदवार डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या प्रचारार्थ कॉर्नर बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. व्यासपीठावर ज्येष्ठ नेते मोईन मास्टर, सय्यद नविदुज्जमा, नगरसेवक मुन्ना इनामदार, सय्यद इलियास, सतीश पवार, आरेफ खान, सादेक जामा, इरफान चाऊस यांची उपस्थिती होती. या बैठकीला अल्पसंख्याक समाजातील शेकडो नागरिकांची उपस्थिती होती.

डॉ.योगेश क्षीरसागर म्हणाले की, क्षीरसागर परिवार अल्पसंख्याक समाजाला सोबत घेऊन चालणारा परिवार आहे. आम्ही समाजकारण किंवा राजकारण करताना कधीच जात धर्म बघितला नाही. समाजाच्या प्रत्येक गरजेवेळी आमचा परिवार उभा राहिला आहे. आता समाजाने देखील आमच्यासाठी उभे राहावे. आमच्या पक्षाची आणि आमची समाजासाठी स्पष्ट भूमिका घेतली आहे. अजितदादा, धनुभाऊंच्या माध्यमातून पेठ बीडमधील इदगाहसाठी १ कोटीचा निधी



उपलब्ध करून आणला आहे. जनतेने माझ्यावर विश्वास टाकून संधी द्यावी, त्या संधीचे सोने केल्याशिवाय राहणार नाही, असेही डॉ.योगेश क्षीरसागर म्हणाले. यावेळी मुस्लिम समाज बांधवांची मोठ्या संख्येने गर्दी होती.

अल्पसंख्यांक विकास परिषदेच्या जिल्हाध्यक्षांसह इतरांचा प्रवेश

डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या नेतृत्वाखाली अनेक मुस्लिम कार्यकर्त्यांनी प्रवेश केला. यात भारतीय अल्पसंख्याक विकास परिषदेचे जिल्हाध्यक्ष शेख अफरोज (लाला), जुबेर खान, फरोक शेख, शेख सादेक (जुमा पेठ वाले) यांच्यासह मित्र परिवाराने जाहीर प्रवेश केला.

टकारी समाजाचा पाठिंबा

टकारी समाजाच्यावतीने नाळवंडी नाका परिसरात कॉर्नर बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. समजाचे प्रदेशाध्यक्ष डॉ.लक्ष्मण जाधव यांच्या पुढाकारातून बैठकीचे आयोजन केले होते. या बैठकीला नगरसेवक बाळासाहेब गुंजाळ, अशोक वाघमारे, अमोल पौळ, सतपाल लाहोट, लक्ष्मण गलांडे यांच्यासह अनेक पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

**भावसार समाजाची झाली बैठक**

बीड शहरातील नागोबा गल्ली येथे भावसार समाजाची बैठक पार पडली. यावेळी सभागृह, तरुणांसाठी रोजगार, महिलांसाठी बचत गट अशा मागण्या केल्या. या भावसार समाजाच्या सर्व समस्या सोडविणार असल्याचे आश्वासन डॉ.योगेश क्षीरसागर यांनी दिले. यावेळी बारा बलुतेदार अध्यक्ष प्रकाश कानगावकर, भाजप शहराध्यक्ष जगदीश गुरखुदे, विकास जोगदंड, रिपाइंचे विलास जोगदंड आदींची उपस्थिती होती.

### अल्पसंख्याकांच्या कामात टक्केवारी घेणाऱ्या आमदाराला धडा शिकवा -फारूक पटेल

माजी उपनगराध्यक्ष फारूक पटेल बोलताना म्हणाले की, आपल्या मस्जिद, खान खा, कब्रस्थानचे संरक्षण करणाऱ्याला मतदान करा. डॉ.भारतभूषण क्षीरसागर यांनी अल्पसंख्याक समाजाच्या विकासासाठी कायमच काम केले आहे. त्यांनी अल्पसंख्याक समाजासाठी खान खासाठी जागा उपलब्ध करून बांधून पण दिले. तसेच, कोरोना काळात तक्रिया मस्जिद येथील कब्रस्थानमध्ये जागा कमी पडत असल्याने तत्काळ त्याला लागूनच असलेली दोन एकर जागा उपलब्ध करून दिली. मात्र आमदाराने यामध्ये कायमच आडकाठी आणण्याचा प्रयत्न केला. समाजाच्या विकासकामात देखील टक्केवारी घेणाऱ्या या आमदाराला आता धडा शिकवण्याची वेळ आली आहे. डॉ.योगेश क्षीरसागर हे सर्व धर्माला सोबत घेऊन पुढे जाणारे नेतृत्व आहे. त्यांच्या माध्यमातून अल्पसंख्याक भागात अनेक दर्जेदार विकासाची कामे झाली आहेत. आपले मत वाया जाऊ न देता डॉ.योगेश क्षीरसागर यांनाच मोठ्या मताधिक्याने निवडून आणण्याचे आवाहन फारूक पटेल यांनी केले.



# बीडमध्ये संदीप क्षीरसागरांचे तुफान...

## मोमीनपुऱ्यातील कॉर्नर बैठकीने विधानसभेच्या विजयावर शिक्कामोर्तब

### रेकॉर्डब्रेक गर्दी; आ. संदीप क्षीरसागर मतदारांसमोर भावूक

### म्हणाले,तुम्ही दाखवलेल्या विश्वासाला कधीही तडा जाऊ देणार नाही

बीड । प्रतिनिधी

नजर पोहोचेल तिथपर्यंत फक्त मतदारांची गर्दी... गर्दी... आणि गर्दीच... व्यासपीठाच्या चारही दिशेला पहावे तिकडे गर्दीच...गर्दी आणि 'संदीप भैय्या आगे बढो, हम तुम्हारे साथ है' अशा एकमुखी घोषणा, अशा रेकॉर्डब्रेक गर्दीने बीड शहरातील मोमीनपुरा भागातील कॉर्नर बैठकीला अक्षरशः जाहीर सभेचे स्वरूप प्राप्त झाले. या बैठकीतील मतदारांच्या प्रचंड गर्दीने आ. संदीप क्षीरसागर यांच्या विधानसभेच्या विजयावर पुन्हा एकदा शिक्कामोर्तब केले. ही गर्दी पाहून बीड मतदारसंघात आ. संदीप क्षीरसागर यांचे तुफान असल्याच्या प्रतिक्रिया कार्यकर्त्यांनी व्यक्त केल्या.



उपस्थित मतदारांसमोर आ. संदीप क्षीरसागर यांनी तुमचे हे प्रेम आणि आशीर्वाद मी कधीच विसरणार नाही. तुमच्या विश्वासाला कधीही तडा जाऊ देणार नाही, असे सांगत सर्वांनी येत्या २० तारखेला अनुक्रमांक ३, तूतारी वाजवणारा माणूस या चिन्हासमोरील बटन दाबून आपल्या सर्वांची सेवा करण्याची पुन्हा संधी द्या, असे आपुलकीचे आवाहन केले. त्यांच्या या आवाहनाला उपस्थितांनी टाळ्यांचा कडकडाट करत प्रतिसाद दिला.बीड विधानसभा मतदार संघाचे राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्रजी पवार) पक्ष, महाविकास आघाडी व मित्र पक्षाचे अधिकृत उमेदवार आ.

पान ३ वर

# रमेश आडसकर यांच्या विजयावर शिक्कामोर्तब -विजय साळवे

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव मतदार संघातील अपक्ष उमेदवार रमेश आडसकर यांना रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया पाठिंबा जाहीर केला आणि मतदारांच्या भेटी घेत संपूर्ण मतदार संघाचा दौरा पूर्ण केला रमेश आडसकर यांच्या बाबतीत मतदारांन मध्ये अति उत्साही वातावरण आहे त्या मुळे आजच आडसकर यांचा विजय निश्चित असल्याचा आत्मविश्वास रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे बीड जिल्हा अध्यक्ष विजय साळवे यांनी व्यक्त केला आहे.

माजलगाव मतदार संघात जातीय वादि शक्तीला सत्ते पासून दूर ठेवण्या साठी रिपब्लिकन पार्टी




ऑफ इंडियाने पाठिंबा जाहिर केला रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया या पक्षा ची स्थापना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १९५६ मध्ये केली , गोर गरीब दिन दलित दुबळ्या जनतेला न्याय मिळवून देण्यासाठी स्वतंत्र स्टेज निर्माण केले होते मात्र अनेकांनी पक्षाचा गैर वापर केला आणि स्वतः साठी खासदारक्या - आमदारक्या मिळवल्या जातीयवादी पक्षा सोबत घरोबा केला आणि जातीय तेढ निर्माण करून सत्तेचा मलिदा चाखत राहिले मात्र आता जनता हुशार झाली आहे त्या मुळे जातीयवादि पक्षांना आता जनता थारा देणार नसल्याने सत्ताधारी आणि जातीयवादि विचारांचे लोक हवाल दिल झाले आहेत म्हणूनच रिपब्लिकन पान ३ वर

# अनिलदादांना ख्रिश्चन धर्मगुरुंचे मिळाले आशीर्वाद

बीड । प्रतिनिधी

गेल्या चाळीस वर्षांपासून सकल जाती धर्मांतील जनसमुदायास सोबती घेऊन चालणारे बीड विधानसभेचे लोकप्रिय अपक्ष उमेदवार अनिलदादा जगताप यांना विधानसभा निवडणुकीच्या अंतिम टप्प्यात सर्व जाती धर्माचा पाठिंबा आणि आशीर्वाद मिळत आहे. दि. १७ रोजी सकाळच्या सुमारास बीड शहरातील ख्रिश्चन धर्मियांच्या असेम्बली ऑफ गॉड चर्च या पवित्र स्थळी अनिलदादा जगताप यांनी भेट देऊन मुक्त संवाद साधला. याप्रसंगी अनिलदादांनी प्रभु येशू ख्रिस्तांना वंदन केले. धर्मगुरू यांनी अनिलदादांचा स्वागत सत्कार करून अनिलदादांना विजयासाठी शुभेच्छा आशीर्वाद दिले.



दरम्यान अनिलदादांनी उपस्थित ख्रिश्चन बांधव, भगिनींना बीडच्या सर्वांगीण विकासाकरिता येत्या २० नोव्हेंबर रोजी अनुक्रमांक १३ बीड विधानसभा अपक्ष उमेदवार अनिल माणिकराव जगताप या नावाच्या शिलाई मशीन या निशाणीवर बटण दाबून मला प्रचंड मतांना विजयी करा असे आवाहन केले. याप्रसंगी अनिलदादांसोबत सहकारी कार्यकर्ते समर्थक मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होता.

# आ. संदीप क्षीरसागरांच्या विजयासाठी फुलसांगवीत मराठा बांधव एकवटला

फुलसांगवी । प्रतिनिधी

सकल मराठा समाजाचा आरक्षणाचा मुद्दा ऐरणीवर असताना जिल्ह्यातील दिग्गज नेत्यांनी मोठे मौन बाळगले होते. आ. संदीप भैय्या क्षीरसागर एकमेव नेता मराठा समाजाच्या अस्मितेबाबतीत तळमळ करत होता. या नेत्याला पुन्हा विधानभवनामध्ये पाठवण्यासाठी फुलसांगवी व परिसरामध्ये मराठा बांधव एकवटला असून या नेत्याच्या विजयासाठी आम्ही सदैव तत्पर असल्याचे सांगण्यात आले आहे.

संघर्षयोद्धा मनोज जरांगे पाटील यांच्यावतीने उपेक्षित मराठा समाजाला आरक्षण यासाठी मोठे रान पेटवण्यात आलेले आहे. अनेक वेळा त्यांना आमरण उपोषण ही करावे लागले आहे. गावोगावी जाऊन जनतेचे पाठबळ मिळवण्यासाठी मराठा आंदोलनाचा लढा व्यापक करण्यासाठी त्यांनी मोठी चळवळ उभा करण्यात केली आहे. असे असताना जिल्ह्यातील दिग्गज नेत्यांनी मोठे मौन बाळगून अप्रत्यक्ष मराठा आरक्षणाला विरोधच दर्शविला आहे. या चळवळीमध्ये एकमेव नेता म्हणजे आ. संदीप( भैय्या ) क्षीरसागर यांनी मराठा समाजाला पाठबळ देण्याचे कार्य केले आहे. त्यांच्या या ऋणातून उतराई होण्यासाठी फुलसांगवीसह परिसरातून मराठा बांधव एकवटला असून आ.संदीप (भैय्या )क्षीरसागर विजय करण्यासाठी पुढे सरसावले आहेत. आ. संदीप (भैय्या ) क्षीरसागर यांना विजयी करण्याचा एक प्रकारचा त्यांनी विडाच उचलला आहे.

# स्टार प्रचारकांना शेवटचे दोन दिवस जिल्ह्यात मनाई

जालना । प्रतिनिधी

भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये मतदान संपण्याच्या ४८ तास अगोदर म्हणजेच दि. १८ नोव्हेंबर २०२४ रोजी सायंकाळी ६ वाजता जालना जिल्ह्यातील ९९- परतूर, १००- घनसावंगी, १०१- जालना, १०२- बदनापूर, १०३ - भोकरदन या विधानसभा मतदार संघातील मतदार नसलेले आणि बाहेरुन आलेले सर्व राजकीय नेते, पदाधिकारी, पक्ष कायकर्ते, प्रचाराची धुरा सांभाळणारे सर्व व्यक्ती व प्रचाराकरीता आलेल्या स्टार प्रचारकांना जालना जिल्ह्याच्या हद्दीत उपस्थित राहण्यास मनाई करण्यात आली आहे. असे आदेश जिल्हादंडाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी जारी केले आहेत.

महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणूकीसाठी निवडणूकीची अधिसुचना भारत निवडणूक आयोगाव्दाद्वारे प्रसिध्द करण्यात आली आहे. त्यानुसार तात्काळ प्रभावाने आचार संहिता लागु झाली आहे. जालना जिल्ह्यातील ९९- परतूर, १००- घनसावंगी, १०१- जालना, १०२- बदनापूर, १०३- भोकरदन विधानसभा मतदारसंघातील मतदान दि. २० नोव्हेंबर २०२४ रोजी होणार आहे.

लोकप्रतिनिधीत्व अधिनियम १९५१ चे कलम १२६ मधील तरतुदीनुसार मतदान बंद होण्याच्या वेळेपासुन ४८ तास अगोदर संबंधित मतदार संघात प्रचाराचा कालावधी संपणार आहे. जालना जिल्ह्यातील ९९- परतूर, १००- घनसावंगी, १०१- जालना, १०२- बदनापूर, १०३- भोकरदन या विधानसभा मतदार संघात बाहेरून आलेल्या आणि पान ३ वर

# म्हाळस जवळा येथील अनेकांचा डॉ. योगेश क्षीरसागर यांच्या गटात प्रवेश

बीड । प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या विचारांनी प्रेरित होऊन आणि डॉ. योगेश भैय्या क्षीरसागर यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत म्हाळस जवळा येथील अनेक मान्यवरांनी पक्षात प्रवेश केला.

डॉ. योगेश भैय्या क्षीरसागर यांच्या उपस्थितीत झालेल्या या प्रवेश सोहळ्यात ग्रामपंचायत सदस्य अजय राऊत, शंकर भाऊ राऊत, जालिंदर भाऊ राऊत, भरता राऊत, राहुल राऊत, महेश राऊत, सिद्धेश्वर राऊत, कृष्णा राऊत, शाम राऊत, बाबू राऊत, महादेव राऊत, मच्छिंद्र राऊत, रवी राऊत, अमोल राऊत, निखिल ढोरमारे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची सदस्यता घेतली.



कार्यक्रमात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष व उपमुख्यमंत्री मा. अजित दादा पवार, राज्याचे कृषिमंत्री मा. धनंजय मुंडे, माजी मंत्री मा. जयदत्त क्षीरसागर, आणि बीड नगर परिषदेचे माजी उपनगराध्यक्ष मा. हेमंत सेठ क्षीरसागर यांच्या विचारांनी प्रेरित झाल्याचे प्रवेशकर्त्यांनी सांगितले.

प्रवेश सोहळ्यावेळी जिल्हा परिषदेचे सदस्य मा. राजेंद्र राऊत, युवा कार्यकर्ते मा. अतुल काळे, उपसरपंच सुमंत राऊत, आणि नितीन राऊत उपस्थित होते. या प्रवेशामुळे डॉ. योगेश भैय्या क्षीरसागर यांच्या गटाला स्थानिक स्तरावर अधिक बळ मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. गावातील नागरिकांमध्ये या प्रवेशामुळे नवचैतन्य निर्माण झाले असून, डॉ. योगेश क्षीरसागर यांच्या नेतृत्वाखाली गावाचा सर्वांगीण विकास साधला जाईल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# डॉक्टरांच्या समस्यांबाबत डॉक्टरांचा आवाज बणून विधानभवनात काम करणार - पृथ्वीराज

अंबाजोगाई । प्रतिनिधी

केज विधानसभा मतदार संघातीलच नव्हे तर संपूर्ण राज्यातील डॉक्टरांच्या समस्यांबाबत त्यांचा आवाज बनून आपण विधानभवनात काम करणार असल्याची भावना केज विधानसभा मतदार संघाचे महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार पृथ्वीराज साठे यांनी व्यक्त केली. ते अंबाजोगाई शहरातील डॉक्टर असोसिएशनच्या वतीने आयोजित डॉक्टरांच्या स्नेह मिलन संवाद मेळाव्यात बोलत होते. याप्रसंगी व्यासपीठावर माजी आमदार संगीता ठोंबरे, राजकिशोर मोदी, डॉ नरेंद्र काळे, बबन लोमटे, डॉ राजेश इंगोले उपस्थित होते.

डॉक्टरांच्या या स्नेह मिलनाचे सोहळ्यात डॉ नरेंद्र काळे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार



अंबाजोगाईत डॉ.राजेश इंगोले यांच्या पुढाकाराने डॉक्टर असोसिएशनच्या वतीने शहरातील डॉक्टरांचा संवाद मेळावा

पक्षाची भूमिका विशद केली. ज्यावेळी देशात मेडिकल आपत्ती ओढावली त्यावेळी राष्ट्रवादी डॉक्टर सेल सर्वात पुढे होती याचा अभिमान असल्याचे डॉ काळे यांनी या मेळाव्यात नमूद केले. अंबाजोगाई शहरात शासकीय वैद्यकीय सेवेबरोबरच खाजगी सेवा देखील उत्कृष्ट पध्दतीने देत असल्याचे डॉ काळे यांनी सांगितले. डॉक्टर संरक्षण कायदा प्रथमच काँग्रेस- राष्ट्रवादी काँग्रेस शासनाच्या कार्य काळातच अमलात आणला गेला. अनेक शासकीय पान ३ वर

# मतदान करून लोकशाही भक्कम करा-मोहमद खमरोद्दीन

बीड । प्रतिनिधी

लोकशाही हा सर्वोत्तम शासन प्रकार असून भारत हा जगातील सर्वात मोठी लोकशाही असणारा देश आहे लोकशाहीत जनता आपले प्रतिनिधी निवडून त्यांचा मार्फत कारभार करीत असते यशस्वी लोकशाहीसाठी प्रत्येकाने आपल्या मतदानाचा अधिकार बजेवाला पाहिजे येणाऱ्या विधानसभा प्रक्रिये मध्ये प्रत्येक नागरिकांनी आपल्या मताचा वापर करून लोकशाहीला सक्षम करण्यासाठी मतदान करावे असे आव्हान मोहम्मद खमरोद्दीन यांनी केले मोहम्मद खमरोद्दीन यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे की भारतीय लोकशाहीमध्ये महत्त्वपूर्ण अधिकार म्हणजे मतदान करणे होय या अधिकाराचा वापर करणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे लोकशाहीत मतदानाला महत्व असून आपण आपल्या विचाराचा उमेदवार निवडून दिल्यास आपले प्रश्न सोडवण्यासाठी संधी मिळते कुटुंबाच्या महत्त्वाच्या जबाबदाऱ्या पार पाडणाऱ्या महिलांनी सर्व कुटुंबातील व्यक्तींना मतदान करण्यासाठी प्रोस्तोहित केल्यास मतदानाची टक्केवारी निश्चित वाळणार आहे प्रत्येकाने मतदानाचे महत्त्व समजून योग्य प्रतिनिधी निवडून देणे ही लोकशाहीची प्रक्रिया आहे या लोकशाहीत आपला सहभाग मतदानाच्या रूपाने प्रत्येक व्यक्तीने घेण्यासाठी स्वतः मतदान करावे व इतरांना प्रोसोहित करावे असे आव्हान मोहम्मद खमरोद्दीन यांनी केले.



This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...
पुणे विशेष
सोमवार, दि.१८ नोव्हेंबर २०२४ । पान ७

# शरद पवार, संजय राऊत यांच्या भोर, मुळशीत सभा

नसरापूर : भोर-वेल्हा-मुळशी विधानसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे उमेदवार, आमदार संग्राम थोपटे यांच्या प्रचार सांगतेसाठी दोन मोठ्या सभा होत आहेत. भोर तालुक्यात होणाऱ्या पहिल्या सभेला ज्येष्ठ नेते शरद पवार, तर मुळशी तालुक्यात होणाऱ्या दुसऱ्या सभेला शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते, खासदार संजय राऊत उपस्थित राहणार आहेत.



महाविकास आघाडीची भोर मतदारसंघाची पहिली सांगता सभा सोमवारी (ता. १८) सकाळी साडेनऊ वाजता भोर तालुक्यातील कापुरव्होळ-हरिश्चंद्री येथील मैदानावर होत आहे. या सभेला ज्येष्ठ नेते शरद पवार उपस्थित राहणार आहेत. या सभेच्या माध्यमातून ते महाविकास आघाडीचे उमेदवार संग्राम थोपटे यांना विजयी करण्याचे आवाहन करणार आहेत, असे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे भोर तालुकाध्यक्ष रवींद्र बांदल, मुळशीचे महादेव कोंढरे, वेल्ह्याचे संतोष रेणुसे यांनी सांगितले. लोकसभा निवडणुकीच्या वेळी खासदार सुप्रिया सुळे यांच्या प्रचार शुभारंभाची सभा शरद पवार यांच्या उपस्थितीत कापुरव्होळ-हरिश्चंद्री मैदानावर झाली होती. त्यावेळी खासदार सुळे यांच्या मागे ठाम राहिलेल्या आमदार संग्राम थोपटे यांना शरद पवार यांनी भाषणातून पुढील काळात तालुका, जिल्हा, राज्य पातळीवर मी स्वतः संग्राम यांच्या मागे ठाम उभा राहणार असल्याची ग्वाही दिली होती. या घोषणेचे उपस्थितांनी जोरदार स्वागत केले होते. त्या पार्श्वभूमीवर त्याच मैदानावर संग्राम थोपटे यांच्या प्रचारार्थ होत असलेल्या सभेत शरद पवार काय बोलतात? याकडे मतदारसंघाचे लक्ष लागले आहे. थोपटे यांच्या प्रचार सांगतेच्या दुसऱ्या सभेला खासदार संजय राऊत उपस्थित राहणार आहेत. त्यांनीदेखील लोकसभा निवडणुकीत खासदार सुळे यांच्या प्रचारावेळी संग्राम थोपटे विधानसभा अध्यक्ष झाले असते, तर महायुती सरकार आलेच नसते, असे सांगून थोपटेंना बळ दिले होते. आता थोपटेंच्या विधानसभेच्या प्रचारासाठी संजय राऊत यांची ही सभा मुळशी तालुक्यातील सुंदरबन मंगल कार्यालय कासार आंबोली येथे सोमवारी (ता. १८) दुपारी तीन वाजता होत आहे. महाराष्ट्रात महाविकास आघाडी सरकार सत्तेवर येण्यासाठी आमदार संग्राम थोपटे यांना मतदानाचे आवाहन खासदार राऊत करतील, तसेच आमदार थोपटे यांच्या प्रचारात सक्रिय असलेल्या शिवसैनिकांना यामुळे मोठे बळ मिळणार आहे, अशी माहिती शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे भोर तालुकाप्रमुख ज्ञानेश्वर शिंदे, राजगडचे दीपक दामगुडे, मुळशीचे सचिन खैरे यांनी दिली. या दोन्ही सभांना मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित राहणार असून, या सभांमध्येच आमदार संग्राम थोपटे यांच्या विजयावर शिक्कामोर्तब होईल, असा विश्वास काँग्रेसचे भोर तालुकाध्यक्ष शैलेश सोनवणे, वेल्हे तालुकाध्यक्ष नाना राऊत व मुळशी तालुकाध्यक्ष गंगाराम मातेरे यांनी व्यक्त केला आहे.

# लबाडी करणाऱ्या गद्दारांना घरी बसवून महाराष्ट्र धर्म जागवा; खा. अमोल कोल्हेंची सरकारवर टीका

**हडपसर । प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील ऐंशी मतदारसंघात गद्दारी झाली.त्यात हडपसरचाही समावेश होता. मात्र, या संघर्षाच्या काळात शहर अध्यक्ष प्रशांत जगताप ढाल बनून पवार साहेबांच्या सोबत राहिले. गद्दारीचा कलंक कितीही गुलाबी रंग लावला तरी पुसला जाणार नाही. ही निवडणूक विचारांची, महाराष्ट्र धर्म जागवण्याची आहे. चोरी व लबाडी करून मोठी होणारी ही माणसे आहेत.

त्यांना इमानदारीने भाजी-भाकरी खाणारा चांगला माणूस घरी बसवणार आहे, अशी टीका राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे खासदार डॉ.अमोल कोल्हे यांनी केली. हडपसर मतदारसंघातील महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार प्रशांत सुदाम जगताप यांच्या प्रचारार्थ हडपसरमध्ये आयोजित जाहीर सभेत डॉ. अमोल कोल्हे बोलत होते. काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते माजी मंत्री बाळासाहेब शिवरकर, माजी आमदार मोहन जोशी, माजी महापौर अंकुश काकडे,माजी उपमहापौर निलेश मगर, माजी नगरसेवक योगेश ससाणे, विजय देशमुख, दिलीप आबा तुपे, दिलीप शंकर तुपे, समीर तुपे, प्रवीण तुपे, कुमार तुपे, प्रशांत सुरसे,



नितीन आरु, महेंद्र बनकर, गणेश फुलारे, प्रा.विद्या होडे यांच्यासह महाविकास आघाडीतील सर्वच घटक पक्षांचे नेते, पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. या वेळी अपक्ष उमेदवार सुशील मते यांनी प्रशांत जगताप यांना पाठींबा दिला. डॉ. अमोल कोल्हे म्हणाले, पक्ष, चिन्ह पळवून आपल्या बापाशी गद्दारी करणाऱ्यांना घरी बसवावे लागेल.राज्यात फिरतोय, महाविकास आघाडीचे सरकार येणार हे स्पष्ट दिसतेय. सरकार येताच सहा महिन्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होतील. हडपसर स्वतंत्र महापालिका होईल. त्यासाठी काळजीपूर्वक 'तुतारी वाजवणारा माणूस' चिन्हासमोरील बटण दाबून प्रशांत जगताप यांना मतदान करा. प्रशांत जगताप म्हणाले, ही निवडणूक गद्दारी विरुद्ध निष्ठा अशी आहे. या राज्यात ८० आमदार विकले गेले. पक्षाशी त्यांनी गद्दारी केली.हडपसरमध्येही पक्षाशी गद्दारी केली. जो आपल्या पक्षाचा, नेत्याचा होऊ शकत नाही,ते समाजाचे कधी होत नाहीत. त्यामुळे हडपसरचा स्वाभिमानी मतदार हा डाग पुसून काढण्यासाठी सज्ज झाला आहे

# पिंपळे सौदागरमधील आरोग्य शिबिराला नागरिकांचा प्रतिसाद

पिंपळे सौदागर दि. - येथील उन्नती सोशल फाउंडेशन, ऑल सिनियर सिटीझन असोसिएशन आणि वेंसर हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित मोफत आरोग्य शिबिराचा लाभ घेत परिसरातील रहिवाशांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. उन्नतीच्या प्रांगणात शनिवार दि. १५ रोजी हे शिबिर पार पडले. सकाळी दहा ते दुपारी दोन या दरम्यान झालेल्या या शिबिराचे उद्घाटन उन्नतीच्या संचालिक डॉ. कुंदाताई भिसे , संजय भिसे आणि वेंसर हॉस्पिटलच्या डॉ. शरुन शितोळे यांच्याहस्ते करण्यात आले. या शिबिरात डॉ. शरुन शितोळे, डॉ. समीर पाटील, डॉ. शैलेश तारु यांच्या मार्गदर्शनाखाली नेहा



रणभिसे, विशाखा, डॉ. प्रांजली यांनी सहभागी रहिवाशांची रक्तदाब, शुगर, डोळे तपासणीसोबतच सांधेदुखी , गुडघेदुखी याबाबत आरोग्य विषयक सल्ला देऊन मार्गदर्शन केले. शिबिराच्या यशस्वितेसाठी वेन्सर हॉस्पिटलचे नितीन पंडीत, सतीश सावंत, अभिनय तोंडलेकर, तुषार गव्हाणे, राजूमामा आणि ऑल सिनियर सिटीझन असोसिएशनचे डॉ. सुभाष पवार, सखाराम ढाकणे, विलास जोशी, रमेश वाणी, सुभाष पाटील, अशोक येळंमकर, अनिलकुमार शाह, अशोक वारकर आदिंनी परिश्रम घेतले.

## प्रतिभा पवार, रेवती सुळेंना टेक्सटाईल पार्कमध्ये जाण्यापासून रोखले

**बारामती । प्रतिनिधी**


ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या पत्नी प्रतिभा पवार, त्यांची नात व खा. सुप्रिया सुळे यांची कन्या रेवती सुळे यांना बारामतीतील टेक्सटाइल पार्कमध्ये जाण्यापासून रोखण्यात आले. खासदार सुनेत्रा पवार या टेक्सटाईल पार्कच्या अध्यक्षा आहेत. यासंबंधी खा. सुप्रिया सुळे यांच्या कार्यालयाकडून व्हीडिओ प्रसिद्धीला देण्यात आला. त्यानुसार प्रतिभा पवार व रेवती सुळे यांना बारामती टेक्सटाईल पार्कच्या प्रवेशद्वारावर तब्बल अर्धा तास थांबवून ठेवण्यात आले. अर्ध्या तास थांबल्यानंतर आतमध्ये सोडले नसल्याचा आरोप खासदार सुप्रिया सुळे यांच्या कार्यालयाच्या वतीने करण्यात आला आहे.

याबाबत प्रसिद्धीस दिलेल्या व्हिडीओमध्ये बारामती टेक्सटाइल पार्कसमोर गाडी थांबलेली दिसते. यामध्ये सीईओ यांनी सांगितल्यामुळे पार्कचे गेट बंद केल्याचे सुरक्षारक्षक सांगत आहे. या व्हिडीओचे मोटारीमधील एका ज्येष्ठ महिलेने चित्रीकरण केले आहे. त्यांनी त्या सुरक्षारक्षकाला का लावले गेट, काय झालं? अशी विचारणा केली. आतमध्ये आम्हाला खरेदी करायची आहे, आम्ही काय चोरी करायला आलो आहे का,असा सवाल देखील या महिलेने सुरक्षारक्षकाला केला आहे. त्यावर तो साहेबांनी सांगितल्यामुळे मी गेट बंद केले आहे, माझी तेवढीच ड्युटी आहे असे सांगतो आहे. तर चित्रीकरण करणारी ती महिला साहेबांना फोन करा, त्यांना सांगा की आम्हाला आतमध्ये जात खरेदी करायची आहे, असे सांगत आहे. परंतु सुरक्षारक्षक गेट न उघडण्यावर तसेच फोन न करण्यावर ठाम असल्याचे दिसते. तुम्हीच साहेबांना फोन करा, त्यांनी सांगितले तर मी गेट उघडेन असे तो म्हणाल्याचे व्हिडीओत दिसून येत आहे

# महागणपती मंदिर ११००० पणत्यांनी उजळले

रांजणगाव गणपती - श्री रांजणगाव महागणपती मंदिरात त्रिपुरारी पोर्णिमेनिमित्त विविध उपक्रमांनी साजरी करण्यात आली. त्यामध्ये पहाटे श्रींचा अभिषेक, तसेच दुपारी १२ वाजता देवस्थान ट्रस्टचे मुख्य विश्वस्त डॉ. ओमकार देव यांच्या हस्ते श्री महागणपतीची महापूजा करण्यात आली.

सायंकाळी ५ वाजता ह.भ.प. नरहरी महाराज सांगळे, आळंदी देवाची यांची किर्तनसेवा झाली, त्यानंतर मंदिर परिसरामध्ये ११००० पणत्यांचे दीपप्रज्वलन व फटाक्यांची भव्य आतषबाजी करण्यात आली. गणेशभक्त प्रगतशील शेतकरी आनंदराव दिनकरराव पाचुंदकर पाटील



रांजणगाव (ता. शिरूर) : महागणपती मंदिरात त्रिपुरारी पौर्णिमेनिमित्ताने मंदिर

व नानासाहेब दिनकरराव पाचुंदकर पाटील यांच्या वतीने ११००० पणत्या व तेलडबे देवस्थान ट्रस्टला देण्यात आले, अशी माहिती देवस्थान ट्रस्टच्या अध्यक्षा स्वाती पाचुंदकर पाटील यांनी दिली.

रांजणगाव गणपती या तीर्थक्षेत्रास त्रिपुरारी पौर्णिमेचे विशेष महत्त्व असल्यामुळे मंदिर परिसरात हजारो पणत्या उजळून दीपोत्सव साजरा करण्यात आला. दीपोत्सवात विविध प्रकारची व आकाराची रांगोळी देवस्थान ट्रस्टचे जनसंपर्क अधिकारी रमाकांत शेळके व इतर कर्मचाऱ्यांनी रेखाटली होती. आकर्षक रांगोळी व हजारो पणत्यांचे दीपप्रज्वलन भाविकांचे लक्ष वेधून घेत होते. त्रिपुरारी पौर्णिमेनिमित्त कॅबिनेट वनमंत्री, गोवा विश्वजीत राणे, यांच्याकडून १ किलो ५० ग्रॅम वजनाचा चांदीचा पाश श्री महागणपती चरणी अर्पण करण्यात आला.

# बसपाचे सरकार न आल्यास नव्या सरकारमध्ये सहभागी होऊन जनेतला न्याय देऊ

**पुणे । प्रतिनिधी**

पक्षाला सरकार स्थापन करायचे मात्र न झाल्यास तारतम्य ठेवत आगामी सरकार बनविणा-या पक्षाला समर्थन देवून आणि सरकारमध्ये सहभागी होवून लोकांना न्याय देवू असे आश्वासन बहुजन समाज पक्षाच्या प्रमुख मायावतींनी पुण्यात बोलताना दिले आहे. वडगाव शेरी मतदारसंघाचे उमेदवार डॉ. हुलगेश चलवादी यांच्या प्रचारार्थ येरवड्यातील प्रादेशिक मनोरुग्णालयाच्या मैदानात आज सभा पार पडली यावेळी त्या बोलत होत्या.




बहुजन समाज पक्षाने मागील चार टर्ममध्ये तळागाळातील समाजाला नेतृत्व देत उत्तर प्रदेशसारख्या देशातील सर्वांत मोठ्या राज्यात सत्ता मिळवली. प्रत्येक व्यक्तिला नोकरीची शाश्वती, पक्के घरे आणि अनेक योजनांचा लाभ दिला आहे. त्यामुळे आता महाराष्ट्रातही उपेक्षित वर्गाचा प्रतिनिधी बसपाच्या माध्यमातून विधीमंडळात पोहोचवायला हवा, असे मत त्यांनी यावेळी व्यक्त केले. तसेच यावेळी त्यांनी निवडणूक स्वबळावर का लढवण्याचा निर्णय घेतला यावरही भाष्य केले.

बसपने कायम अनेक पक्षांना पाठिंबा दिला आहे. यापूर्वी जेव्हा जेव्हा इतर पक्षांसोबत मिळून बसपने निवडणूक लढवली तेव्हा तेव्हा दलितांचे मत सोबत असलेल्या पक्षाच्या उमेदवाराला गेली. परंतु जातीवादी मानसिकतेमुळे त्यांच्या पक्षाचे बहुतांश मत आमच्या पक्षाला मिळत नाही. त्यांची मत अंतर्गत रित्या दुस-या उमेदवाराला जातात. त्यामुळे यंदा लोकसभेसह विधानसभा स्वबळावर लढविण्याचा निर्णय घेतल्याचे स्पष्टीकरण मायावती यांनी दिले. उत्तरप्रदेश राज्यात आतापर्यंत काँग्रेस, भाजप तसेच इतर पक्षांचे 'गठबंधन' सरकार राहिले आहे. मात्र जातीवाद, भांडवलशाही विचारांमुळे दलित, आदिवासी, अल्पसंख्याक, मुस्लिम आणि ओबीसींच्या स्थितीत सुधारणा झालेली दिसत नाही. त्याचप्रमामाणे बेरोजगार, शेतकरी, मजूरांची स्थिती हलाखीची आहे. म्हणून या पक्षांना मतदान करून अपमानित होऊ नका. डॉ. बाबासाहेबांनी या वर्गांच्या उन्नतीसाठी संविधानात कायदेशीर अधिकार दिले असल्याचे देखील मायावती यांनी मत व्यक्त केले.

# आळंदीत दर्शनबारीसाठी जमीन अधिग्रहण

आळंदी, : दर्शनावेळी चेंगराचेंगरीसारख्या दुर्घटना घडू नये यासाठी आळंदीतील कार्तिकी वारीच्या दर्शनबारीचे इंद्रायणीकाठी शिक्षण संस्थेची खासगी जागा अधिग्रहण करण्याचा आदेश हवेली प्रांताधिकारी डॉ. यशवंत माने यांनी काढला आहे. आपत्ती व्यवस्थापन म्हणून हा आदेश काढण्यात आला असून सोमवार (ता. २०) ते शनिवार (ता. ३०) या काळात ही जागा अधिग्रहीत केली जाणार आहे. यामुळे सुमारे अठ्ठेचाळीस गुंठे जागेत तात्पुरत्या स्वरूपात दर्शन मंडप उभारणे देवस्थानसाठी सुलभ आणि सोयीचे झाले आहे.

संत ज्ञानेश्वर महाराजांच्या संजीवन समाधीदिननिमित्त आळंदीत चार ते पाच लाख वारकरी कार्तिकी वारीत आळंदीत सहभागी होतात. शनिवार (ता. २३) ते १



डिसेंबरपर्यंत कार्तिकी वारी सोहळा आहे. या वारीसाठी राज्यभरातून अनेक दिंड्या, लाखो वारकरी आळंदीत चारपाच दिवस आधीपासून येतात. वारकरी इंद्रायणी स्नान, माउलींचे समाधी दर्शन, नगरप्रदक्षिणा असा नित्यनेम करतात. येणाऱ्या वारकऱ्यांसाठी एकाच ठिकाणी शहरात दर्शनबारीसाठी मोठी आणि सुसज्ज जागा उपलब्ध नाही. यामुळे काही वर्षे शिक्षणसम्राट डॉ. विश्वनाथ कराड यांच्या इंद्रायणी काठच्या जागेत तात्पुरत्या स्वरूपात जागेचे अधिगृहण करून दर्शनमंडप उभा केला जातो. यंदाच्या वर्षीही डॉ. माने यांनी जमीन अधिग्रहणाचा आदेश काढला आहे. ३० नोव्हेंबरपर्यंत ही जमीन तात्पुरत्या मंडपासाठी अधिग्रहण केली जात असल्याचे आदेशात म्हटले आहे. याबाबतची मागणी आळंदी नगरपरिषद, दिघी पोलिस ठाणे आणि अप्पर तहसीलदार पिंपरी चिंचवड यांनी लेखी स्वरूपात केली होती. याबाबत आळंदी देवस्थानचे व्यवस्थापक ज्ञानेश्वर वीर म्हणाले, ''आळंदीमध्ये लाखोंच्या संख्येने वारकरी येतात. त्यांच्या सोयीसाठी इंद्रायणीकाठी सुयोग्य जागा असल्याने पोलिस आणि महसूल प्रशासनाने अठ्ठेचाळीस गुंठे जागा अधिग्रहीत करून दर्शन मंडप उभारण्यासाठी दिली आहे. सध्या देवस्थानकडून या जागेत मंडप उभारण्याचे काम सुरू असून दोन ते तीन दिवसांत संपूर्ण दर्शनमंडपाचे काम पूर्ण होईल. वारकऱ्यांना पुणे-आळंदी रस्त्याने येताना हा मंडप लागेल. रस्ता आणि नदीच्या बाजूने काहीशी मोकळी जागा असल्याने चेंगराचेंगरीसारखी परिस्थिती निर्माण होणार नाही. हे लक्षात घेता प्रशासनाने ही जागा ठरविली आहे.

# 'यशवंत' सुरू करण्यासाठी पाठपुरावा करणार; खा. सुप्रिया सुळे यांचे आश्वासन

**पुणे । प्रतिनिधी**

संघर्ष हा आपल्या नशिबातचआहे. आ. अशोक पवार यांच्या संपूर्ण कुटुंबाला त्रास दिला. त्यांना आयुष्यातून संपवण्याचा प्रयत्न केला, पण हा मर्द डगमगला नाही. शरद पवार यांच्या खांद्याला खांदा लावून काम करणारे अशोक पवार नमले नाहीत. शिवाजीराव भोसले बँक अवसायनात गेली. आपल्याच मतदारसंघातील व सर्व ठिकाणाच्या खातेदारांचे, ठेवीदारांचे पैसे अडकले आहेत. त्याबद्दल व यशवंत सहकारी साखर कारखाना सुरू करण्यासाठी पाठपुरावा करणार, अशी ग्वाही खासदार सुप्रिया सुळे यांनी दिली. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचे अधिकृत उमेदवार आ. अशोक पवार यांच्या लोणी काळभोर



येथील प्रचार सभेत खा. सुळे बोलत होत्या.

खा. सुळे म्हणाल्या, हा देश अदृश्य शक्तीने चालत नाही, तर हा देश बाबासाहेब आंबेडकरांच्या संविधानाने चालतो. अशोक पवार यांना श्रीसंभाजी महाराजांच्या स्मारकाच्या उद्घाटन समारंभाला बोलावले नाही. आम्हाला तर नेहमीच विरोधक टाळतात. आम्ही निधीसाठी मागणी केली की आम्हाला निधी देत नाहीत. आर. आर. आबांच्या काळामध्ये जी मोठी पोलिस भरती झाली तशीच मोठी पोलिस भरती आम्ही करणार आहोत. पोलिसांची अडीच लाख पदे रिक्त असल्याचे खा. सुळे यांनी सांगितले.काळभोर येथे खा. सुळे म्हणाल्या, आम्ही निधी मागितला तर काट मारली जाते, पण बँक लुटणाऱ्यांना मात्र पदक दिले जाते. मी, अशोक पवार व खासदार डॉ. अमोल कोल्हे अशी आमची तिघांची इमानदारी ही ताकद आहे. बारामतीमध्ये अजित पवारांसमोर मंगलदास बांदल यांनी शरद पवारांना संपवण्याची भाषा केली. पण, मी मात्र विरोधकांना संपवण्याची भाषा करणार नाही. मी अशोक पवार यांना विकासासाठी मत मागत आहे, असेही सुप्रिया सुळे यांनी सांगितले.

# बोरीपार्धी येथे बिबट्याच्या हल्ल्यात नवजात अर्भकाचा मृत्यू

केडगाव : येथे ऊस तोडणी मजूराच्या तीन महिन्याच्या बालकावर बिबट्याने हल्या केल्याने बाळाचा मृत्यू झाला. एका मजूराने ऊसात बिबट्याचा पाठलाग करत बिबट्याच्या तोंडातून बाळाची सुटका केली. रूग्णालयात उपचार सुरू असताना बाळाचा मृत्यू झाला. ही घटना आज दुपारी चार वाजण्याच्या सुमारास घडली.

विष्णुला मृत घोषित केल्यानंतर त्याच्या आई वडिलांनी रूणालयाच्या बाहेर टाहो फोडला. दापोडीतील काका पिसे यांच्या गु-हाळावर मोरे दांपत्य ऊस तोडणीचे काम करत आहे. आज नेहमी प्रमाणे ते बोरीपार्धीतील बाळासाहेब टेंगले यांच्या ऊसात ऊस तोडणी करत होते. विष्णुला उसाच्या फडात झोळी करून झोपवले होते. विष्णुला घेण्यासाठी त्याची आई झोळीकडे येत असताना आईसमोर बिबट्या विष्णुला उसात घेऊन गेला. विष्णुच्या आईने हंबरडा फोडल्यानंतर सर्व मजूर बिबट्याच्या मागे धावले. एका मजूराने धाडसाने बिबट्याच्या तोंडातून विष्णुची सुटका केली. विष्णुला तातडीने चौफुला



येथील रूग्णालयात दाखल केले. डॉ. प्रशांत शेंडगे म्हणाले, गळ्याची मुख्य धमणी तुटल्याने रक्तस्त्राव विष्णुच्या छातीत उतरला. त्याची कवटी फ्रॅक्चर झाली होती. विष्णुचा गळा, कान, डोके, पोट, चेह-यावर बिबट्याचे दात व नखांमुळे खोलवर जखमा झाल्या होत्या. विष्णुची गंभीर अवस्था पाहून तेथील परिचारिकांना अश्रू आवरता आले नाही. उपचार सुरू असताना विष्णुचे निधन झाले.

घटना घडल्यानंतर वन विभागाच्या अधिका-यांना ग्रामस्थांनी फोन केले. मात्र २५ किलोमीटरवरून घटनास्थळी यायला अधिका-यांनी तीन तास लावले. सरपंच बी.डी.सोडनवर तक्रार करताना म्हणाले, पिंजरा लावण्यासाठी वारंवार वन विभागाकडे संपर्क केला. दोन वेळा पत्रव्यवहार केला मात्र अधिका-यांनी नेहमी उडवाउडवीची उत्तरे दिली.

आता तातडीने पिंजरा लावावा. वन अधिकारी राहुल काळे यांनी घटनास्थळाला भेट दिली. दरम्यान या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. बोरीपार्धी, दापोडी, वरवंड या भागात बिबट्याचा वावर मोठ्या प्रमाणात वाढल्याने ग्रामस्थांमध्ये घबराट पसरली आहे. आता ऊस तोडी सुरू झाल्या आहेत. त्यामुळे असे प्रकार वारंवार होणार असल्याने वनविभागाने सतर्क राहिले पाहिजे. अशी मागणी आहे

**एका महिन्यात तीन बालकांचा मृत्यू**

एका महिन्यात तीन बालकांचा मृत्यू झाला आहे. तीन दिवसांपुर्वी शिवतेज टेंभेकर ( वय ४ वर्ष ) याचा तर १८ ऑक्टोंबरला वंश सिंग ( वय सहा वर्ष, दोघे रा. मांडवगण ता. शिरूर ) यांचा बिबट्याच्या हल्ल्यात मृत्यू झाला आहे. वंश सिंग ऊस तोडणी मजूराचा मुलगा आहे. विष्णू करण मोरे ( वय तीन महिने रा. दापोडी ता.दौंड, मूळ गाव पाचोरा जि. जळगाव ) असे आज मृत्यूमुखी पडलेल्या बाळाचे नाव आहे. मांडवगण ते बोरीपार्धी या १५ ते २० किलोमीटरच्या परिसरात या तिन्ही घटना घडल्या आहेत. अगोदरच्या दोन घटना घडल्यानंतर जिल्हा प्रशासन व वन विभागाने विशेष खबरदारी न घेतल्याच्या ग्रामस्थांच्या तक्रारी आहेत.